


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ८३ * नांदेड * रविवार, दि. २९ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात नांदेड पोलीस परिक्षेत्र अव्वल

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा सन्मान



**नांदेड (प्रतिनिधी)-** राज्यात राबविण्यात आलेल्या १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यमापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यातील सर्व परिक्षेत्रांत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

दि. २८ मार्च रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तिपत्र देऊन त्यांचा गौरव केला आहे. तत्पूर्वी, शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात केलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती आयोजित समारंभात दिली.

दि. ७ मे २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांनी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन सुधारणा घडवून आणण्यासाठी १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्याचे निर्देश दिले होते. सदर कार्यक्रमांतर्गत प्रशासन अधिक लोकाभिमुख, **(पान ३ वर...)**

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)-** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार, २९ मार्च २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

रविवार, २९ मार्च २०२६ रोजी मुंबई विमानतळ येथून सायंकाळी ४.१५ वा. विमानाने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. सायं. ५.१५ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व मोटारीने हिंगोली गेट नांदेडकडे **(पान ३ वर...)**

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज आ.बोंढारकर यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)-** येथील दक्षिण नांदेड विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या हिंगोली गेट येथील शिवनेरी या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आज रविवार, दि. २९ मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांचे हस्ते करण्यात येणार आहे.



सायंकाळी पाच वाजता पार पडणाऱ्या उद्घाटन सोहळ्यास राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे यांच्यासह नामदार हेमंत पाटील, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि जनतेसाठी हे संपर्क कार्यालय सदैव **(पान ३ वर...)**






# अल्पभार्या

कथा



मजबूत टिकाऊ लाकडाचा हा पलंग आयुष्यभर मला पुरला. मला निर्जीव कधी वाटलाच नाही हा. याला कुणी घडवला माहीत नाही. किती वर्षापासून हा या खोलीत आहे. हे पण मला नाही माहीत. त्याला उत्तम कलाकुसर करून घडवले आहे. माझे सुख-दुःख मी त्याला सांगीतले आहे. माझ्या दु:खात यानेच मला मायेचा आधार दिला आहे. मला स्व कुशीत घेऊन हा पलंग निजला आहे. आज या पलंगावर पडलेले माझे अवाढव्य शरीर जगाचा निरोप घेण्याच्या वाटेवर आहे. कदाचित त्याला दु:ख होत असेल. पण त्याने अशी अनेक दु:ख पचवली असतील. जेवढे वासनांध प्रहार या मंचकावरील स्त्रियांनी सहन केलेत तेवढे या पलंगानेही केलेच असतील.

आज मी शेवटच्या घटका मोजत आहे. पण मी 'माझी प्राणज्योत मावळणार आहे'. असे कदापि बोलणार नाही. कारण ज्योत प्रकाश देते जगाला, आणि मी अंधार भरला अनेकांच्या जीवनात. उद्ध्वस्त केले अनेक संसार. माझ्या मृत्यूचे कुणाला सुखदु:ख नाही. कारण माझे उपयोगी शरीर वासनांध लांडग्यासाठी होते. पण ज्यावेळी त्यात आकर्षकता होती. आता त्यात स्थूलता आली. चवळीच्या शेंगेसारखे असणार माझे शरीर. आता भोपळा होऊन गेले. या खोलीत मी आले. शरीराचा व्यायाम संपूर्ण बंद झाला. चालणे-फिरणे बंद, हाताला काही काम नाही. वाड्याच्या वरच्या मजल्यावरची ही खोली, आणि हीच खोळी माझे विश्व होऊन गेले. बाहेर विश्व आहे. हे त्या खिडकीतून डोकावल्यावर माहीत व्हायचे. ज्या खिडकीतून डोकावयाचे, ती खिडकी सुद्धा वाड्याच्या मागच्या बाजूला. त्या बाजूला फक्त जंगल पसरलेले. वाड्याच्या संरक्षण भिंती जवळचे बघू देत नसायच्या. फक्त मावळतीचा सूर्य न चुकता मला भेटायला यायचा. त्याच्या किरणात मी न्हाऊन घ्यायची. अंघोळ करायला एक लाकडी पसरट भांडे आहे. त्या भांड्यात बसून अंघोळ करायची. नैसर्गिक विधीसाठी एक तश्याच प्रकारचे भांडे आहे. सकाळी न चुकता एक माणूस येतो. हे सर्व स्वच्छ करतो. खोलीची साफसफाई करतो. पाणी भरून ठेवतो. जेवण आणि न्याहारी न चुकता मिळायची.

मला काम एकच होते. ज्या दिवशी या घराचा मालक माझ्या खोलीत झोपायला येईल. त्या दिवशी त्याला खुष करायचे. तो येणार त्या दिवशी माझा दिवसही चांगला असायचा. सकाळीच गजरा पाठवून द्यायचा. चांगल्यातले चांगले मेकअपचे सामान माझ्या जवळ होते. दागिने भरपूर आहेत. जगाच्या बाजारात त्याची लाखोची किंमत असेल. पण मला काडीचा उपयोग नाही आज. चांगले खाणेपिणे पण शरीराला व्यायाम नाही. चवळीच्या शेंगे सारख्या असणाऱ्या शरीराचे पोतं व्हायला वेळ कसा लागणार मग. दुर्मिळ मोकळी हवा. चालण्याचा अभाव, त्यात आवडते चमचमीत जेवण. शरीरात चरबीचा थर वाढायला लागला. जुन्या चोळ्या अंगाला येईनात. एकएक आजार धावत आला मागे. शरीराचे कुठले अवयव चांगले राहिले असण्याची शक्यता कमी आहे. बाहेर डॉक्टरला नेऊन दाखवणे मालकाला शक्य नाही. कारण मालक घरंदाज त्याने रखेल ठेवली आहे. याची बोंब सगळीकडे होणार. वैद्याने न तपासता औषध दिली. काहीसा आराम त्यात मिळाला. शरीराचे सौंदर्य संपले आणि मालक पण दुर्लक्ष करायला लागला. आता अकाली मृत्यूला कवटाळायला लागणार आहे. .

मघापासून माझ्या मृत्यूची वाट पहात चार मजूर ताटकळत उभे आहेत. बिचारे वाट पहात आहेत. कधी मी मरते. त्यांना मला नेऊन पुरायचे आहे. दर पाचसहा मिनटात एक जण येतो. नाकपुडीखाली बोट लावतो. कधी नाडी पकडतो. मी जिवंत असल्याचे समजताच. निराशेचा सुस्कारा टाकून जागेवर जाऊन बसतो. कारण मालकाने त्यांना सांगीतले आहे. तिला नीट पुरल्या बिगर तुकडा मोडू नका. . त्यांनी जिवंतपणीच पुरली असती मला. पण आयुष्यभर गलिच्छ शिव्यांची लाखोली वाहणारी मालकीणबाई लीण बोलली. एक ध्यानात ठेवा. जीव गेल्या बिगर नेऊन पुरू नका. जिता जीव आहे. कोणची तळाली नको या घरात.

पाटलीणबायला काय माहीत. या हरामखोरांनी माझी चार पोरं जिवंतच मातीत पुरलीत ती. त्यांचा पण काय दोष म्हणा. त्ये हुकमाचे पाबंद होते. मालकाला रखेलीची पोरं पाळून मालमत्तेला वारस वाढवायचे नव्हते. माझ्या झालेल्या बाळापैकी एक मुलगा होता. त्याला कुण्या गड्या माणसाने घरी नेला म्हणे. मुलगा फायद्याचा असतो. मुलगी नेऊन तो काय करणार? त्यात रखेलीची मुलगी म्हणजे, मोठेपणी काय दिवे लावील. .

आज आई आठवते मला. बेबस लाचार, मी नको होती तिला. पण निसर्गापुढे कुणाचे चालले आहे. तिला तिच्या पोटाची खळगी भरायचे पडले होते. माझा जन्म म्हणजे तिच्यासाठी दुष्काळात तेरावा महिना होता. पण दहाबारा वर्षाची झाले आणि मला तिच्यापेक्षा मागणी वाढली. बाप मला आठवत नाही. आणि आठवण्यासाठी तो कोण होता. हे माहीत पण असावे लागते. अनेक पुरूषांशी संग केला. प्रेम कुणावर केलेच नाही. नाटकी गोडी गुलाबीने वागले. कारण एकच होते. जगणं. .

ह्या खिडकीतून तो वड मला दिसायचा. आता तो धूसर होत चालला आहे. वटसावित्रीला तो मला हसायचा. कारण त्याची पुजा करायला आलेल्या बायका मला दिसत नव्हत्या. हिरव्या पोषाखात नटूनथटून त्याची पूजा करायच्या. मला त्यावेळेस खूप दु:ख व्हायचे. माझ्या नशीबी त्याची पुजा करायचे भाग्य नव्हते. त्याच्याकडे 'सातजन्म हाच पती मिळावा' म्हणून मागणी असायची. तो अधिकार एका रखेलीला नव्हता. पतिव्रता म्हणून तिला शिक्का पण नव्हता. तिला खानदान नसायचे. कधीकधी मनात सहज विचार यायचा. ज्या स्त्रीयांना पतिव्रता म्हणून शिक्कामोर्तब केले आहे. त्यांच्या मनात नसेल का कधी परपुरुषाचा विचार येत. जसे एखाद्या पुरुषाला एक स्त्री असूनही अनेक स्त्रीयांबरोबर संग करावासा वाटतो. ते बाहेरख्यालीपणा करतात. स्त्रीयांना बंधनं आहेत. म्हणूनही कदाचित त्यांच्याकडून असे पाऊल उचलले जात नसेल. पण जर पतिव्रतेची अशी व्याख्या असेल. तर मग मीच खरी पतिव्रता आहे. कारण जशी समज आली. तेथून माझी इच्छा नसतांना अनेकांनी या शरीराचा उपभोग घेतला. आणि त्या उपभोगात माझे शरीर त्यांना साथ देत होते. पण माझे मन नव्हते. मला अनेकांनी वासनांध नजरेने पाहिले. पण मी कुणाला वासनांध नजरेत पाहिलेच नाही. आज तो वड मला बघून हसतोय. हस बाबा. .तुझ्या शिवाय कोण हसणार मला ?. खूप डोळे वटारून रागात पाहिले तुला. मला तुझा राग नाही येणार. कारण दुसरे कुणी नसायचे खिडकीत. एकमेव तुच असायचास. .

मालकाने खूप हौसमौज पुरवली. पण या खोलीतून बाहेर निघायची सक्ती होती आयुष्यभर. मला तो कोठ्यावरून घेऊन आला. मलाही त्या कोठ्याचा कंटाळा आला होता. रात्रभर नटूनथटून बसायचे. पैश्यासाठी वाटेल ते करायचे. उद्देश हाच असायचा. गिऱ्हाईक प्रसन्न झाला पायजेय. गिऱ्हाईक प्रसन्न झाला म्हणजे जवळचा माल मोकळा करायचा. किती जरी पैसे कमावले तरी त्या पैश्याने इज्जत खरेदी करता येत नव्हती. इज्जत हवी होती. म्हणून कुणाला तरी फसवायचे ठरवले. जाळ्यात ओढण्यासाठी मासोळी पण मोठीच हवी होती. आणि या मालकाच्या फेंया वाढल्या. या ना त्या कारणाने पाटलाला फसवले. तो मला घरी घेऊन आला. पण रखेल म्हणून. .रखेलीला पत्नीचा मान नसतो. हे मला इथे आल्यावर समजले. आजही मी मालकाचा संपूर्ण वाडा पाहिला नाही. आल्या पासून माडीवरची ही बंद खोली नशीबाला आहे. खोलीचा दरवाजा उघडा ठेवायला सक्त मनाई आहे.

वाड्यात काय चालले आहे. ते फक्त कानाने ऐकले. संभाषण जोरात सुरू असले तर. सकाळी साफसफाईला येणाऱ्या माणसाबरोबर थोडंफार बोलणं होते. पाटील मुक्कामी असला की गप्पा करायचा. पिंजऱ्यातल्या पोपटाचे आयुष्य वाट्याला आले माझ्या. आता माझे शरीर थंड पडत चालले आहे. पण शंभर टक्के मृत्यू झाला नाही. तरी या गडी माणसांनी मला उचलले आहे. आता पुरतील. चला दु:खात सुख हेच आहे. जिथे माझ्या बाळांना जिवंत पुरले आहे. तेथे मी आता जाणार आहे. त्यांच्या संगतीत. रक्ताच्या नात्यात रक्त जाणार आहे. .

**– प्रभाकर पवार**
मुरबाड, जि. ठाणे
मो. ९२२६१३०७१०

# इराण-इस्रायल संघर्ष आणि ट्रम्प यांची कुटनीती : भारतासाठी वाढती आव्हाने



मध्यपूर्व हा जगातील सर्वात संवेदनशील आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश आहे. येथे इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष केवळ प्रादेशिक नसून जागतिक स्थैर्यावर परिणाम करणारा आहे. त्याचबरोबर, डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळातील अमेरिका प्रथम कुटनीतीने या प्रदेशातील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची केली. या दोन्ही घटकांचा एकत्रित परिणाम भारतासाठी अनेक पातळ्यांवर आव्हाने निर्माण करतो.

सर्वप्रथम ऊर्जा सुरक्षा हा भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. भारत आपली मोठी ऊर्जा गरज गल्फमधून पूर्ण करतो. या भागातील तणावामुळे तेलपुरवठा विस्कळीत होण्याचा धोका वाढतो आणि कच्च्या तेलाच्या किमती वाढतात. याचा थेट परिणाम महागाईवर आणि सामान्य नागरिकांच्या आर्थिक स्थितीवर होतो. याशिवाय, डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर लादलेल्या कठोर निर्बंधां-मुळे भारताला स्वस्त इराणी तेल आयात करणे मर्यादित झाले, ज्यामुळे ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करण्याची गरज अधिक वाढली. दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे भारताच्या परराष्ट्र धोरणातील संतुलन. भारताचे इस्रायल सोबत संरक्षण, कृषी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मजबूत संबंध आहेत, तर इराण हा भारतासाठी ऊर्जा आणि भू-राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा भागीदार आहे. विशेषतः चाबहार बंदर प्रकल्पाच्या दृष्टीने. अशा परिस्थितीत भारताला अत्यंत काळजीपूर्वक संतुलित धोरण स्वीकारावे लागते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिकेचा दबाव वाढल्याने हे संतुलन अधिक कठीण झाले आहे. तिसरे आव्हान म्हणजे जागतिक व्यापार आणि आर्थिक स्थैर्य. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे शिपिंग मार्ग असुरक्षित होतात, ज्यामुळे आयात-निर्यातीवर परिणाम होतो. डॉलरच्या तुलनेत रुपयावर दबाव येतो आणि परकीय गुंतवणुकीत अनिश्चितता निर्माण होते. यामुळे भारताच्या आर्थिक विकासावर अप्रत्यक्ष परिणाम होतो.

चौथे, मध्यपूर्वेत मोठ्या संख्येने भारतीय कामगार कार्यरत आहेत. संघर्ष वाढल्यास त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीत भारत सरकारला मोठ्या प्रमाणावर बचाव आणि स्थलांतर मोहिमा राबवाव्या लागतात. हे एक मानवी आणि राजनैतिक दोन्ही प्रकारचे आव्हान आहे. शेवटी, आंतरराष्ट्रीय कुटनीतीच्या पातळीवरही भारताची भूमिका महत्त्वाची ठरते. युनायटेड नेशन सारख्या संस्थांमध्ये भारताला शांतता आणि स्थैर्य यासाठी सक्रिय भूमिका घ्यावी लागते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या एकतर्फी बहुपक्षीय कुटनीती कमजोर झाल्याने भारतासारख्या देशांना अधिक जबाबदारीने वागावे लागते.

इराण-इस्रायल संघर्ष आणि डोनाल्ड ट्रम्प यांची कुटनीती यामुळे निर्माण झालेली जागतिक परिस्थिती भारतासाठी आव्हानात्मक आहे. ऊर्जा सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि संतुलित परराष्ट्र धोरण या तीन क्षेत्रांवर भारताला विशेष लक्ष द्यावे लागेल. योग्य धोरणात्मक पावले उचलल्यास भारत या आव्हानांना संधीमध्ये रूपांतरित करून जागतिक स्तरावर आपले स्थान अधिक मजबूत करू शकतो.

**ऊर्जा सुरक्षेवरील परिणाम :** भारत हा जगातील सर्वात मोठ्या कच्च्या तेल आयातदार देशांपैकी एक आहे. भारताच्या ऊर्जा गरजांचा मोठा भाग हा मध्यपूर्वेतील देशांवर अवलंबून आहे. विशेषतः पॅरसियन गल्फ आणि होरमूज सामुद्रधुनी हे जागतिक तेल वाहतुकीचे अत्यंत महत्त्वाचे मार्ग आहेत. या भागात जर इराण-इस्रायल संघर्षामुळे तणाव निर्माण झाला, तर तेलपुरवठा विस्कळीत होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो.

या परिस्थितीचा थेट परिणाम आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींवर होतो. पुरवठा कमी झाला किंवा अस्थिर झाला की, तेलाच्या किमती वाढतात. भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेत याचा परिणाम महागाई वाढण्यात दिसतो. पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमती वाढल्यामुळे वाहतूक, उत्पादन आणि शेती या सर्व क्षेत्रांवर परिणाम होतो आणि एकूणच आर्थिक विकासाचा वेग मंदावतो.

याशिवाय, डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळात इराणवर लादण्यात आलेल्या कठोर आर्थिक निर्बंधां-मुळे भारताला इराणकडून मिळणारे स्वस्त कच्चे तेल मोठ्या प्रमाणावर कमी झाले. याचा परिणाम असा झाला की, भारताला तुलनेने महाग पर्याय शोधावे लागले, ज्यामुळे ऊर्जा आयात खर्च वाढला. या सर्व परिस्थितीमुळे भारतासाठी ऊर्जा धोरण अधिक आव्हानात्मक बनले आहे. त्यामुळे भारताला एकाच स्रोतावर अवलंबून न राहता ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण आवश्यक ठरते. यामध्ये नवीकरणीय ऊर्जा इतर भौगोलिक प्रदेशांतील तेल पुरवठा आणि ऊर्जा कार्यक्षमतेवर भर देणे हे महत्त्वाचे उपाय ठरतात. एकूण निष्कर्ष असा की, मध्यपूर्वेतील तणाव आणि आंतरराष्ट्रीय निर्बंध यांच्या संयुक्त परिणामामुळे भारताची ऊर्जा सुरक्षा अधिक असुरक्षित बनते आणि त्यामुळे दीर्घकालीन स्थैर्यासाठी विविधीकरण हीच अपरिहार्य रणनीती ठरते.

**परराष्ट्र धोरणातील संतुलन :** भारतासाठी परराष्ट्र धोरणातील सर्वात मोठे आणि गुंतागुंतीचे आव्हान म्हणजे विविध देशांशी संतुलित संबंध राखणे. जागतिक राजकारणात भारताला एकाच वेळी वेगवेगळ्या हितसंबंधांचा समतोल साधावा लागतो. विशेषतः इस्रायल आणि इराण यांच्याशी असलेले संबंध हे याचे उत्तम उदाहरण आहे. इस्रायल हा भारताचा अत्यंत महत्त्वाचा संरक्षण आणि तंत्रज्ञान भागीदार आहे. ड्रोन तंत्रज्ञान, क्षेपणास्त्र प्रणाली, सायबर सुरक्षा आणि शेती तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये घनिष्ठ सहकार्य आहे. त्यामुळे भारताच्या संरक्षण आधुनिकीकरणात इस्रायलची भूमिका महत्त्वाची ठरते. दुसरीकडे इराण हा भारतासाठी ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा देश आहे. भारताला इराणकडून स्वस्त कच्चे तेल मिळण्याबरोबरच, छबाहर पोर्ट सारखा प्रकल्प भारतासाठी मध्य आशिया आणि अफगाणिस्तानशी जोडणारा एक धोरणात्मक मार्ग आहे. त्यामुळे इराण भारताच्या भू-राजकीय हितांसाठीही महत्त्वाचा ठरतो. या संतुलनाच्या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांचा मोठा परिणाम दिसून येतो. त्यांच्या अमेरिका प्रथम दृष्टिकोनामुळे इराणवर कठोर आर्थिक निर्बंध लादले गेले, ज्यामुळे भारताला इराणसोबतचे आर्थिक व्यवहार मर्यादित करावे लागले. त्याचबरोबर, अमेरिकेच्या धोरणांचे पालन करण्याचा अप्रत्यक्ष दबाव भारतावर वाढला, विशेषतः ऊर्जा आयात आणि परराष्ट्र संबंधांच्या बाबतीत. या परिस्थितीत भारताला बहु सरेखन म्हणजेच अनेक देशांशी स्वतंत्र पण संतुलित संबंध ठेवण्याचे धोरण अधिक काळजीपूर्वक राबवावे लागते. कोणत्याही एका शक्तीगटाकडे पूर्ण झुकाव न करता, भारताने आपल्या राष्ट्रीय हितांना प्राधान्य देत धोरणात्मक लवचिकता ठेवणे आवश्यक आहे. इस्रायल-इराण संबंध आणि अमेरिकेच्या बदलत्या धोरणांमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणातील संतुलन अधिक गुंतागुंतीचे झाले आहे, आणि त्यामुळे सूक्ष्म, लवचिक व हितसंबंध-आधारित कुटनीती ही काळाची गरज बनली आहे.

**व्यापार आणि आर्थिक परिणाम :** भारतासाठी इराण- इस्रायल संघर्षासारख्या आंतरराष्ट्रीय तणावांचे आर्थिक परिणाम अत्यंत व्यापक आणि थेट स्वरूपाचे असतात. जागतिक व्यापार व्यवस्था आज परस्परावलंबी असल्यामुळे एका प्रदेशातील अस्थिरता संपूर्ण जगाच्या बाजारपेठांवर परिणाम करते. सर्वप्रथम, संघर्षामुळे जागतिक बाजारपेठांमध्ये मोठी अस्थिरता निर्माण होते. विशेषतः पर्शियन गल्फ परिसर हा ऊर्जा आणि व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने, येथील तणावामुळे तेल, वायू आणि शिपिंग खर्चात वाढ होते. परिणामी, आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक महाग आणि अनिश्चित बनतो. दुसरे महत्त्वाचे परिणाम म्हणजे शिपिंग मार्गांवरील धोका. होरमुज सारख्या सामुद्रधुनीत जर असुरक्षितता निर्माण झाली, तर भारताचा आयात-निर्यात व्यापार थेट प्रभावित होतो. कंटेनर वाहतूक उशिरा होणे, विमा खर्च वाढणे आणि लॉजिस्टिक्स महाग होणे यामुळे भारतीय निर्यातदारांना मोठा फटका बसतो. याचा परिणाम विशेषतः वस्त्रोद्योग, रसायन उद्योग आणि अभियांत्रिकी वस्तूंवर दिसतो. तिसरे म्हणजे, आर्थिक बाजारांवर दबाव निर्माण होतो. अशा भू-राजकीय तणावाच्या काळात विदेशी गुंतवणूकदार सावध होतात, ज्यामुळे शेअर बाजारात चढ-उतार वाढतात. भारताच्या चलनावर म्हणजेच रुपयावरही दबाव येतो, कारण डॉलरची मागणी वाढते आणि आयात खर्च वाढतो. याशिवाय, डोनाल्ड ट्रम्प कार्यकाळातील व्यापार धोरणे, विशेषतः व्यापार युद्ध आणि निर्बंध यांनी जागतिक व्यापार व्यवस्थेत आधीच अनिश्चितता निर्माण केली होती. चीन आणि अमेरिका यांच्यातील व्यापार संघर्ष, तसेच इराणसारख्या देशांवरील निर्बंधांमुळे जागतिक पुरवठा साखळी अस्थिर झाली. याचा अप्रत्यक्ष परिणाम भारताच्या निर्यातीवरही झाला, कारण आंतरराष्ट्रीय मागणी आणि व्यापार प्रवाहात बदल झाले.

इराण-इस्रायल संघर्ष आणि बदलते अमेरिकन व्यापार धोरण यामुळे भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांसाठी व्यापार आणि आर्थिक स्थैर्य राखणे अधिक कठीण झाले आहे. त्यामुळे भारताला अधिक लवचिक, विविधीकृत आणि सुरक्षित व्यापार धोरण स्वीकारणे आवश्यक ठरते. प्रादेशिक सुरक्षा आणि भारतीय नागरिक : भारतासाठी मध्यपूर्वेतील अस्थिरता हा केवळ आर्थिक किंवा राजनैतिक मुद्दा नसून तो थेट मानवी सुरक्षिततेशी संबंधित अत्यंत संवेदनशील विषय आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्यास संपूर्ण मध्यपूर्व प्रदेशात सुरक्षा परिस्थिती बिघडण्याची शक्यता असते. मध्यपूर्वेत लाखो भारतीय नागरिकविशेषतः कामगार, नर्सेस, अभियंते आणि सेवा क्षेत्रातील कर्मचारीकार्यरत आहेत. हे सर्वजण पर्शियन गल्फ देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगारासाठी गेलेले आहेत. त्यामुळे कोणतीही युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सर्वात आधी उभा राहतो.


संघर्षाच्या काळात विमानसेवा, रस्ते आणि समुद्री मार्ग बाधित होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांचे स्थलांतर करणे अत्यंत कठीण आणि गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत भारत सरकारला मोठ्या प्रमाणावर आपत्कालीन मोहिमा राबवाव्या लागतात, जसे की ऑपरेशन प्रकारच्या बचाव मोहिमा. यात लॉजिस्टिक्स, राजनैतिक समन्वय आणि सुरक्षित वाहतूक यांचा समावेश असतो. याशिवाय, अस्थिरतेमुळे दहशतवाद आणि कट्टरतावाद वाढण्याचा धोका असतो. संघर्षग्रस्त प्रदेशात सुरक्षा यंत्रणा कमकुवत झाल्यास गैर-राज्य घटक सक्रिय होतात, ज्यामुळे केवळ स्थानिक नव्हे तर आंतरराष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होतो. याचा अप्रत्यक्ष परिणाम भारताच्या अंतर्गत सुरक्षेवरही होऊ शकतो. मध्यपूर्वेतील संघर्ष हा भारतासाठी मानवी सुरक्षा, स्थलांतर व्यवस्थापन आणि दहशतवाद प्रतिबंध या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये गंभीर आव्हाने निर्माण करतो. त्यामुळे भारताला सतत सज्ज राहून प्रभावी राजनैतिक आणि सुरक्षा उपाययोजना कराव्या लागतात.

**आंतरराष्ट्रीय कूटनीती आणि भारताची भूमिका :** भारत आजच्या जागतिक व्यवस्थेत एक उदयोन्मुख शक्ती म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विशेषतः इराणइस्रायल संघर्षासारख्या गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत भारताला अत्यंत संतुलित आणि विचारपूर्वक परराष्ट्र धोरण स्वीकारावे लागते. युनायटेड नेशन सारख्या बहुपक्षीय मंचांवर भारताची भूमिका नेहमीच शांतता, संवाद आणि सहकार्य यावर आधारित राहिली आहे. अशा संस्थांमध्ये भारताला कोणत्याही एका बाजूने न झुकता, आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानवी मूल्ये यांना प्राधान्य देत संतुलित भूमिका घ्यावी लागते. त्यामुळे भारताची प्रतिमा एक जबाबदार जागतिक शक्ती म्हणून अधिक दृढ होते. या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळातील एकतर्फी धोरणांचा परिणाम जागतिक कूटनीतीवर दिसून आला. त्यांच्या अमेरिका प्रथम दृष्टिकोनामुळे बहुपक्षीय कूटनीती काही प्रमाणात कमकुवत झाली आणि आंतरराष्ट्रीय निर्णय प्रक्रियेत मतभेद वाढले. यामुळे लहान आणि मध्यम शक्ती असलेल्या देशांसाठी जागतिक धोरण समजून घेणे अधिक गुंतागुंतीचे झाले. अशा परिस्थितीत भारतासाठी एक महत्त्वाची संधी निर्माण होते. भारत तटस्थ मध्यस्थ म्हणून भूमिका अधिक मजबूत करू शकतो. कारण भारताचे दोन्ही बाजूंशी इराण आणि इजराइल संबंध आहेत. त्यामुळे भारत संवाद आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी विश्वासार्ह पूल म्हणून काम करू शकतो. याशिवाय, भारताची वाढती आर्थिक आणि लोकसंख्यात्मक ताकद यामुळे तो जागतिक पातळीवर एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उदयास येत आहे. ऊर्जा, व्यापार, तंत्रज्ञान आणि सुरक्षा या क्षेत्रांमध्ये भारताची भूमिका अधिक महत्त्वाची होत आहे. योग्य कूटनीतीच्या माध्यमातून भारत आपले स्थान केवळ प्रादेशिक शक्ती म्हणून नव्हे तर जागतिक निर्णय प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणून मजबूत करू शकतो. आंतरराष्ट्रीय कूटनीतीच्या बदलत्या स्वरूपात भारतासाठी आव्हाने असली तरी त्याचबरोबर मोठ्या संधीही आहेत. संतुलित, शांतताप्रिय आणि संवादाधारित धोरण स्वीकारून भारत जागतिक स्तरावर आपली विश्वासार्हता आणि नेतृत्व क्षमता अधिक मजबूत करू शकतो.

**दीर्घकालीन धोरणात्मक आव्हाने :** भारतासमोर इराणइस्रायल संघर्षासारख्या आंतरराष्ट्रीय तणावांच्या पार्श्वभूमीवर काही दीर्घकालीन धोरणात्मक आव्हाने निर्माण झाली आहेत. ही आव्हाने केवळ तात्कालिक नसून देशाच्या भविष्यातील आर्थिक, सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारी आहेत. सर्वप्रथम, ऊर्जा स्वावलंबनाची गरज ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. भारत आजही मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलासाठी पर्शियन गल्फ वर अवलंबून आहे. या अवलंबित्वामुळे जागतिक संघर्ष, निर्बंध किंवा पुरवठा अडथळ्यांचा थेट परिणाम भारतावर होतो. त्यामुळे सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनं आणि हरित हायड्रोजन यांसारख्या पर्यायांवर भर देणे अत्यावश्यक झाले आहे. ऊर्जा स्वावलंबनामुळे केवळ आर्थिक स्थैर्य नाही तर धोरणात्मक सुरक्षितताही वाढते. दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे संरक्षण क्षमता वाढवणे. जागतिक अस्थिरतेच्या काळात कोणत्याही देशाला आपली सुरक्षा यंत्रणा मजबूत ठेवणे आवश्यक असते. आधुनिक युद्धे ही केवळ पारंपरिक नसून सायबर, ड्रोन आणि तंत्रज्ञानाधारित आहेत. त्यामुळे भारताला संरक्षण संशोधन, स्वदेशी उत्पादन आणि तंत्रज्ञान विकासावर अधिक गुंतवणूक करावी लागते. मजबूत संरक्षण क्षमता ही देशाच्या सार्वभौमत्वाची हमी असते. तिसरे आव्हान म्हणजे परराष्ट्र धोरणात लवचिकता राखणे. जागतिक राजकारण सतत बदलत असल्याने कोणत्याही एका गटावर किंवा देशावर पूर्ण अवलंबून राहणे धोकादायक ठरते. इराण इजराइल आणि इतर महासत्तांशी संतुलित संबंध राखणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत बहु सरेखन धोरण अधिक प्रभावी ठरते, ज्यामध्ये भारत आपल्या राष्ट्रीय हितांनुसार विविध देशांशी स्वतंत्र आणि लवचिक संबंध ठेवतो. ऊर्जा स्वावलंबन, संरक्षण बळकटीकरण आणि लवचिक परराष्ट्र धोरण ही भारताच्या दीर्घकालीन स्थैर्याची तीन प्रमुख आधारस्तंभ आहेत. या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास भारत जागतिक अनिश्चिततेच्या काळातही मजबूत आणि आत्मनिर्भर राष्ट्र म्हणून पुढे जाऊ शकतो.

**-प्रा. डॉ. आरती राणे**
अर्थशास्त्र विभाग
के.आर.एम.महिला महाविद्यालय, नांदेड

# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले



मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. चार वर्षापूर्वी ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते.

मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ. नागनाथ कोतापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम. ए. पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# नुसताच पोकळ डोलारा नसावा

नुसताच शब्दांचा पाऊस नसावा,
शब्दांना अर्थाचा गंध असावा,
देहाला कॉस्मेटिक चा लेप नसावा,
देह आतून सुंदर असावा.
नुसताच माणूस दिसण्याला नसावा,
असण्याचा त्यात अधिवास असावा,
जगणे नसावे नुसतेच स्वप्न,
त्यात अथक प्रयत्नांचा हात असावा.
नुसताच बाजार भावनेचा नसावा,
बुद्धीचाही सिंहाचा वाटा असावा,
जगणे नसावे नुसताच भास,
वास्तवाचा मोकळा श्वास असावा.
नुसताच स्वार्थाचा अंधार नसावा,
जगणे असा दिवा बनावा,
प्रकाश त्याच्या परोपकाराचा,
दुसऱ्याच्याही अंगणात पडावा.

**-प्रा. अमित शिंदे**
नांदेड
मो. ९७६७८५१०४६.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली गॅस एजन्सीधारक व सेल्स ऑफिसर्स यांच्यासोबत बैठक

## गॅस वितरकांना महत्त्वाचे निर्देश; प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गॅस कंपन्यांचे सेल्स ऑफिसर्स आणि गॅस एजन्सीधारकांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत गॅस वितरकांना अत्यंत महत्त्वाचे निर्देश देण्यात आले आहेत.

**बैठकीतील महत्त्वाचे निर्णय आणि सूचना:** होम डिलिव्हरी बंधनकारक: सर्व गॅस एजन्सीधारकांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांना एजन्सीवर बोलावून गॅस देऊ नये. ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर 'होम डिलिव्हरी' देणे बंधनकारक आहे. तसेच ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर 'होम डिलिव्हरी'साठी काही अडचण आल्यास त्यांनी त्यांच्या तालुक्यातील खालीलप्रमाणे निरीक्षण अधिकारी (नायब तहसीलदार पुरवठा) यांचेशी संपर्क करावा.

संपर्क मो. क्रं. – नांदेड–७०३०७ ७३०४०, अर्धापूर–८८०५० ६८९५४, मुखेड– ९३५६८ ०६४०५, धर्माबाद– ९४२१८ ४१४४७, मुदखेड– ९४४५१ १२७८२, उमरी– ८८०५४ ४७८३७, बिलोली– ७६२०७ ७९७०६, लोहा– ९६५७२ २४०४२, हिमायतनगर– ८३०८० ७३०८९, हदगांव–८८०५० ६८९५४, कंधार–९८२३७ ५७३४५, माहूर–९४०३१ ८४४७३, किनवट–९८५०२ ९६०९६, भोकर– ९४२११ ८३६०२, देगलूर–९४२३ ८०५०६४, नायगांव– ७०५७० ०२८६५

**एजन्सीवरील गर्दी टाळा:** ग्राहकांनी गॅस सिलिंडर घेण्यासाठी एजन्सीवर गर्दी करू नये. बुकिंग केल्यानंतर लवकरात लवकर सिलिंडर घरपोच मिळेल, अशी चोख व्यवस्था करण्याचे आदेश वितरकांना देण्यात आले आहेत.

**ग्राहकांना आवाहन:** जिल्ह्यातील सर्व गॅस ग्राहक आणि लाभार्थ्यांनी गॅस एजन्सीवर गोंधळ न घालता संयम राखावा. गॅस बुक केल्यानंतर तो आपल्या दारात पोहोचवण्याची जबाबदारी संबंधित एजन्सीची आहे. प्रशासनाच्या या नियोजनाला नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या ग्राहकांची बायोमेट्रिक आधार प्रमाणीकरण प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही त्यांनी गॅस एजन्सीवर जाण्याची आवश्यकता नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरून खालील पद्धतीने ही प्रक्रिया पूर्ण करू शकतात.

**मोबाईल अॅपद्वारे:** १. सर्वप्रथम प्ले–स्टोअरवरून 'adhaar Face RD (Early ccess)' हे अॅप डाऊनलोड करा. त्यानंतर तुमच्या गॅस कंपनीचे अधिकृत अॅप डाऊनलोड करा: Indane: IndianOil ONE, Bharat Gas: Hello BPCL, HP Gas: HP Pay या अॅपमधील 'adhaar e-KYC' पर्यायावर जाऊन आपला चेहरा स्कॅन करून पडताळणी पूर्ण करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## श्रीक्षेत्र गंगणबीड येथे पालखी उत्सव, शिवपार्वती विवाहसोहळा व चैत्र यात्रेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –नायगाव तालुक्यातील प्रसिद्ध व



जागृत देवस्थान असलेल्या श्रीक्षेत्र गंगणबीड येथे आंबली बारसीनिमित्त रविवार, दि. २९ ते मंगळवार दि. ३१ मार्च या कालावधीमध्ये पालखी उत्सव, शिवपार्वती विवाहसोहळा व चैत्र यात्रा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती देवस्थान समितीकडून देण्यात आली.

या सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रम असे– रविवार, दि. २९ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता देवस्थानचे मुख्य पुजारी भागवतअप्पा स्वामी यांच्या निवासस्थानी शिव–पार्वतीची विधिवत महाभिषेक आरती होऊन बँडबाजा पथक, हलगी–सनई व भजनी मंडळीच्या निनादात वाजत– गाजत गावातील मुख्य रस्त्याने शिवपार्वती पालखी सायंकाळी ८ वाजता हनुमान मंदिर येथे पोहचेल. तिथेही विधिवत महाभिषेक–आरती होईल. त्यानंतर पालखी रात्री ९ वाजता पारंपरिक वाद्याच्या गजरात श्रीक्षेत्र महादेव मंदिरात पोहचेल. तिथे महारुद्रभिषेक आणि रात्री ९.३० वाजता शिवपार्वती शुभविवाह संपन्न होईल. तद्नंतर आरती व फटाक्यांची नयनरम्य आतीषबाजी होणार आहे.

सोमवार, दि. ३० मार्च रोजी सकाळी ८ वाजता द्वादशी बारसीनिमित्त गावकऱ्यांतर्फे चैत्र– आंबलीचा महाप्रसाद होईल. नंतर दिवसभर परिसरातील असंख्य भाविक काठी–कावडी घेऊन शिवपार्वतीचे दर्शनाचा कार्यक्रम होणार आहे. मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी सकाळी ९ वाजता शिवपार्वतीचे पूजन होऊन पारंपरिक वाद्याच्या गजरात पालखी गावाकडे प्रस्थान करेल. गावातील मुख्य रस्त्याने हनुमान मंदिर मार्गे देवस्थानचे मुख्य पुजारी अप्पा स्वामी यांच्या घरी विधिवत पूजा आरतीने महोत्सवाची सांगता होणार आहे. परिसरातील सर्व भक्तमंडळींनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीक्षेत्र गंगणबीड ग्रामस्थ मंडळी व मंदिर देवस्थान समितीतर्फे करण्यात आले.

# सिडको येथील श्रीराम मंदिर सभागृहाचे आ. बोंढारकर यांच्या हस्ते भूमिपूजन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – निवडणूक काळात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करत सिडको परिसरातील रामनगर येथील श्रीराम मंदिर परिसरातील १० लक्ष रुपयांच्या सभागृहाचे भूमिपूजन नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते दशमीनिमित्ताने २७ मार्च रोजी करण्यात आले.

सिडको परिसरातील भाविक भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीराम मंदिर येथे मनपा निवडणूक काळात नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी परिसरातील नागरिकांना शिवसेना उमेदवार प्रचारार्थ आयोजित बैठकीत सभागृह बांधून देण्याचे आश्वासन दिले होते.

रामनवमी उत्साहात संपन्न झाल्यानंतर दशमी निमित्ताने आयोजित धार्मिक कार्यक्रमांत २७ मार्च रोजी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी दहा लक्ष रुपयांच्या सभागृहाचे भूमिपूजन करून आश्वासनांची पूर्तता केली. यावेळी नांदेड दक्षिणचे जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, नांदेड दक्षिण शहरप्रमुख तुलजेश यादव, सिडको शहर प्रमुख सुहास पाटील खराणे, उपशहरप्रमुख पप्पू गायकवाड, भि. ना. गायकवाड, रवी थोरात, रवी रायबोळे यांच्यासह मंदिर विश्वस्त समिती पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांचा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला तर उपस्थित मान्यवरांनी श्रीराम मंदिर येथे दर्शन घेतले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नितीन जळकोटे, राज आडसकर, माधव घाणेकर, बबन शिंदे, आशिष धानोरकर, राजन जोजारे, गणेश भोसकर, मयुर लोलगे, गुरूकिरण जोशी व सिडको राम मंदिर पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी परिसरातील हजारो भाविक–भक्तांनी दशमी निमित्ताने आयोजित महाप्रसादाचा लाभ घेतला.

# नांएसोचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे यांचा अध्यक्षपदाचा राजीनामा मंजूर

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी प्रकृतीच्या कारणास्तव दिलेला अध्यक्षपदाचा राजीनामा नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीने शुक्रवार, दि.२७ रोजी डॉ.काब्दे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारीणीच्या बैठकीत सर्वानुमते मंजूर केला आहे.



हैदराबाद मुक्तिसंग्रामातील थोर स्वातंत्र्य सैनिक स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या या नामांकित संस्थेचे डॉ. व्यंकटेश काब्दे दीर्घकाळ अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. मात्र, वयोमानानुसार गेल्या काही दिवसांपासून प्रकृतीच्या तक्रारी वाढत असल्याने संस्थेला पूर्ण वेळ देणे शक्य होत नसल्याची भावना व्यक्त करत त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव व कार्यकारिणीकडे सादर केला होता.

डॉ. काब्दे यांनी राजीनामा देऊ नये म्हणून संस्थेच्या संचालक मंडळासह सर्वस्तरातून प्रयत्न करण्यात आले. शेवटी डॉ. काब्दे यांच्या कुटुंबियांच्या सल्ल्यानुसार कार्यकारीणीने शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी संस्थेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत राजीनामा मंजूर केला.

डॉ. काब्दे यांनी कार्यकारिणी सदस्यांसोबत चर्चा केली. या बैठकीत बोलताना डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी स्पष्ट केले की, अध्यक्षपदाचा राजीनामा देत असलो तरी कार्यकारिणी सदस्य म्हणून संस्थेसाठी कार्य करत राहणार आहे. नवतरुण कार्यकारिणीला मार्गदर्शन करत राहीन. तत्पूर्वी डॉ. कुंजम्मा काब्दे, डॉ. अजित काब्दे, डॉ. आदिती काब्दे यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांनी डॉ. काब्दे यांना कार्यमुक्त करण्याबाबत कार्यकारिणी सदस्यांशी चर्चा केली व सहमती दर्शवली.

यानंतर झालेल्या कार्यकारिणी बैठकीत सर्वानुमते त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला. त्यानंतर विद्यमान उपाध्यक्ष सीए. डॉ. प्रवीण पाटील यांच्याकडे अध्यक्षपदाचा कार्यभार सोपविण्यात आला. या वेळी सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. शेवटी डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या नेतृत्वाखालील कार्याचा गौरव करत त्यांचे मार्गदर्शन सस्थेच्या हिताचे राहील, अशी अपेक्षा कार्यकारिणीतील सदस्यांनी व्यक्त केली.

## दारूची बातमी का छापली म्हणत पत्रकारास धक्काबुक्की करीत मारहाण

### पत्रकार संरक्षण कायद्याप्रमाणे ४ जणांविरुध्द गुन्हा दाखल

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील लहान येथील अवैध दारूविक्री बाबत बातमी लावल्याच्या राग धरून आंबेगाव येथील पत्रकाराला मारहाण करीत, त्यास मोटारसायकलवर बसवून घेऊन जाण्याचा प्रयत्न केल्याची घटना गुरुवार, दि. २६ मार्च रोजी रात्री ९–३० वा. घडली. याप्रकरणी पोलीस ठाण्यात ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रामचंद्र ऊर्फ मनोज माणिकराव मनपुर्वे रा. आंबेगाव यांनी लहान येथील अवैध दारू विक्रीविषयी बातमी प्रसिद्ध केली. मनोज मनपुर्वे हे आंबेगाव येथे आपल्या घरी होते. दोनजण मोटारसायकलवर येऊन आमच्या गावची बातमी पेपरला देणारा तू कोण आहेस? असे म्हणत त्यांनी मनपुर्वे यांच्याशी हुज्जत घातली आणि त्यांना धक्काबुक्की, मारहाण केली.आरोपींनी मनपुर्वे यांचा मोबाईल हिसकावून घेतला आणि त्यांना जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून नेण्याचा प्रयत्न केला. झटापट झाल्यामुळे मनपुर्वे यांनी आरडाओरडा केल्याने कुटुंबीय व जनता मदतीला धावले. आरोपींनी गावात दिसलास तर जिवे मारू अशी धमकी देऊन पळ काढला. या प्रकरणी अर्धापूर पोलिसांनी संतोष गोले व इतर ४ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १३७(२), ६२, ११५(२), ३५१(२), ३५१(३) आणि पत्रकार संरक्षण कायद्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# नांदेड महापालिकेच्या लेखा व वित्त विभागास आय.एस.ओ मानांकन



**नांदेड (प्रतिनिधी)**– महानगरपालिकेच्या कामकाजात पारदर्शकता आणि गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने टाकलेले पाऊल यशस्वी झाले असून, महापालिकेच्या लेखा व वित्त विभागाला (ccounts Finance Department) प्रतिष्ठित ISO 9001:2015 हे जागतिक दर्जाचे मानांकन प्राप्त झाले आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारांचे अचूक व्यवस्थापन, पारदर्शक कार्यपद्धती आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या जलद सेवांची दखल घेऊन हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्या तिसाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून त्याचप्रमाणे १०० दिवसांचा कृती आराखडा दृष्टीपथात ठेवून या नामांकनाच्या अनुषंगाने लेखा विभागात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास महापौर कविता मुळे, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले, महिला बालकल्याण सभापती सदिच्छा पाटील, पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अभिजित वायकोस, अजितपालसिंघ संधु, नितीन गाढवे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे यांच्यासह पालिकेच्या इतर अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त रामकथा व हनुमान चालीसा पठण; रामभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

**शंकरनगर (प्रतिनिधी)**– श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्री भास्करराव बापुराव पाटील खतगावकर पब्लिक स्कूल येथे धार्मिक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. सकाळपासूनच शाळेच्या प्रांगणातील साईबाबा मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तिभावाने दर्शन घेतले.

सायंकाळी सहा वाजता शाळेच्या प्रांगणात हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेचे प्राचार्य दुर्गाप्रसाद पांडे यांनी रामकथा सांगत प्रभू श्रीराम यांच्या जीवनातील आदर्श, संस्कार व कर्तृत्व याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर संगीताच्या सुरावटीत हनुमान चालीसा गायन करण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

या कार्यक्रमादरम्यान जय श्रीरामच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली. विद्यार्थ्यांनाही रामकथेच्या माध्यमातून मूल्य शिक्षण देण्यात आले. कार्यक्रमानंतर शाळेच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैज्ञानिक दृष्टिकोन दृढ होण्यासाठी मराठी विज्ञान परिषदेची स्थापना –संजय देऊळगावकर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन दृढ होण्यासाठी मराठी विज्ञान परिषदेची स्थापना करण्यात आली, असे प्रतिपादन मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह संजय देऊळगावकर यांनी केले. नुकतीच मविपची बैठक पार पडली तीत ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले, मराठीतून विज्ञान व्यक्त व्हावे आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन दृढ व्हावा, या उदात्त ध्येयाने म. ना. गोगटे यांनी मराठी विज्ञान परिषदेची स्थापना २४ एप्रिल, १९६६ रोजी केली. २४ एप्रिल २०२६ रोजी ही संस्था साठ वर्षांचा टप्पा गाठत असून हा हीरक महोत्सव केवळ कालावधीचा उत्सव नसून विज्ञानप्रबोधनाच्या सातत्यपूर्ण कार्याचा गौरव आहे. आज व्यक्तीचे आयुष्यमान वाढले असले तरी संस्थांचे दीर्घायुष्य त्यांच्या उद्दिष्टांच्या सामाजिक उपयुक्ततेवर आणि कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर अवलंबून असते. अनेक संस्था क्षणभंगुर ठरतात; परंतु ज्या संस्था समाजहितासाठी सातत्याने झटतात, त्या काळाच्या कसोटीवर टिकतात. मराठी विज्ञान परिषद ही अशाच संस्थांपैकी एक भक्कम आणि प्रेरणादायी संस्था असल्याचे सांगितले जात आहे.

म. ना. गोगटे यांच्यासह डॉ. रा. वि. साठे, प्रा. प. म. बर्वे, श्री. ज. ग. बोधे, डॉ. म. आ. रानडे आणि प्रा. रा. वि. सोवनी या मान्यवरांनी परिषदेची पायाभरणी केली. मुंबईत सुरू झालेली ही चळवळ लवकरच पुणे, ठाणे, नाशिक, सांगली, गोवा अशा विविध ठिकाणी पोहोचली. विज्ञानाविषयी असलेली लोकांची आस्था आणि कार्यकर्त्यांची तळमळ यामुळे परिषदेच्या शाखांचा विस्तार झपाट्याने झाला. १९७१ पासून विभागांना स्वायत्तता देण्यात आली आणि आज ६७ विभाग कार्यरत आहेत. गेल्या सहा दशकांत शंभरहून अधिक विभागांची निर्मिती झाल्याचा अंदाज आहे, यावरून या चळवळीची व्याप्ती स्पष्ट होते असेही ते म्हणाले.

परिषदेने पहिल्याच वर्षी वार्षिक अधिवेशनांची परंपरा सुरू केली आणि ती आजपर्यंत अखंड सुरू आहे. याचबरोबर 'मराठी विज्ञान परिषद पत्रिका' हे मुखपत्र सुरू करून विभागांमधील संवाद आणि विज्ञानलेखनाला चालना दिली. ५८ वर्षांचा प्रवास पूर्ण केलेल्या या पत्रिकेचे ६३३ अंक प्रकाशित झाले आहेत. मराठी साहित्यक्षेत्रात अनेक मासिके बंद पडत असताना ही पत्रिका आजही ठामपणे उभी आहे, हे विशेष उल्लेखनीय आहे.

शिक्षक आणि प्रयोगशाळा सहाय्यक यांच्यासाठी आयोजित कार्यशाळा हा शाखेचा आणखी एक महत्त्वाचा उपक्रम आहे. २०१९ मध्ये ४५२ शिक्षकांनी सहभाग घेतला, तर २०२४ मध्येही तीन दिवसीय कार्यशाळेत ६० जणांना प्रशिक्षण देण्यात आले. यामुळे अध्यापनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत झाली. 'संशोधनाकडे वळा' या व्याख्यानमालेतून विद्यार्थ्यांना संशोधन, पेटंट आणि कॉपीराइट यांसारख्या विषयांची ओळख करून देण्यात आली, ज्यामुळे त्यांची वैज्ञानिक दृष्टी अधिक परिपक्व झाली असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

# नांदेड फार्मसी कॉलेजमध्ये महिला सक्षमीकरण शिबीर संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– श्री शारदा भवन शिक्षण संस्था संचलित नांदेड फार्मसी कॉलेजमध्ये एक दिवसीय महिला सशक्तीकरण शिबीर नुकतेच पार पडले. यात लाठी–काठी, कराटे प्रशिक्षण देण्यात आले. जय दुर्गा सेवाभावी संस्था संचलित संचालिका पूजा ठाकूर बिसेन तसेच त्यांच्या टीममधील जयश्री जयस्वाल, श्रद्धा बिसेन, प्रकाश, शशिकांत पाटील यांनी महाविद्यालयातील एम. फार्म. व बी. फार्म. विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. शिबीर आयोजन प्रा.स्वाती टेकाळे, सुनीता मुदिराज यांनी केले होते. मुलींचा प्रतिसाद बघता आणि त्यांच्या मागणीनुसार हा एक नियमित उपक्रम करावा व मुलींना ह्या गोष्टीसाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्रीराम नवमीनिमित्त शिवमहापुराण कथा, श्रीराम जन्मोत्सवाची महाप्रसादाने सांगता

**नरसीफाटा (प्रतिनिधी)**– येथील श्रीराम मंदिर परिसरात रामनवमीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या संगीतमय शिवमहापुराण कथा व लक्ष्मण शक्ती श्रीराम जन्मोत्सव भक्तीमय सोहळ्याची सांगता पंचक्रोशीतील भाविकांच्या उपस्थितीत महाप्रसाने करण्यात आली.




हभप पिराजी महाराज राजलवाड व हभप रामकिशन महाराज राजेलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुढी–पाडव्यापासून रामनवमीपर्यंत शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले. हनुमानगड संस्थान सेलू येथील प्रख्यात शिवकथा प्रवक्ते स्वामी ब्रम्हानंद सरस्वतीजी महाराज यांनी उपस्थित भाविकांना आध्यात्मिक मार्गाचा उपदेश केला. तर रात्री लक्ष्मण शक्ती प्रभू श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यासह भाविकांनी कथेचा लाभ घेत मंदिर परिसरात गर्दी केली होती.

शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी रामकिशन महाराज राजेलवाड यांचे काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनात त्यांनी रामजन्म सोहळा आणि भक्तीचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. टाळ–मृदंगाच्या गजरात आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचा लाभ घेतला. हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी हभप भगवान महाराज मुगावकर, गंगाधर वडगावे, भिमराव पांचाळ, रंगनाथ राजेलवाड, बाबूराव राजेलवाड, हाणमंतराव कोकणे, तुकाराम वडजे, बाबूराव कोरे, पांडुरंग पांचाळ, नागोराव काचेबोईनवाड, माधव तुप्पेकर, नामदेव पांचाळ, गौड, दिगंबर कोरे, व्यंकट बोधणे यांच्यासह गावातील महिलांनी परिश्रम घेतले.

**पान १ वरून...**

**१५० दिवसीय ई–गव्हर्नन्स...**

गतिमान, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित व्हावे, या उद्देशाने विविध स्तरांवर व्यापक सुधारणा अपेक्षिल्या होत्या. यामध्ये संकेतस्थळ सुधारणा, आपले सरकार पोर्टल, ई–ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, सोशल मीडिया एकत्रीकरण, व्हॉट्सपद्वारे सेवा वितरण तसेच नाविन्यपूर्ण वेब ॲप्लिकेशन या विषयांवर विशेष भर देण्यात आला होता.

त्यानुसार पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रासाठी संकेतस्थळ नव्याने तयार करून ते अधिक सुरक्षित व नागरिकाभिमुख केले होते. संकेतस्थळावर विविध शासकीय योजना व सेवांचे केलेले एकत्रीकरण, आपले सरकार पोर्टल अंतर्गत तक्रारींची विहित वेळेतील सोडवणूक, ई–ऑफिस प्रणालीद्वारे कागदविरहित व जलद फाईल निपटारा, इंटरॅक्टिव्ह डॅशबोर्डद्वारे अचूक व अद्ययावत माहितीची उपलब्धता, याशिवाय परिक्षेत्रातील अर्ज चौकशीच्या कामकाजासाठी सुरू केलेली 'संवेदना' ही AI आधारित संगणकीय कार्यप्रणाली, तक्रारदारांचे समाधान अजमावण्यासाठी दिलेली Feedback सुविधा, नांदेड परिक्षेत्रातातील गुन्ह्यांच्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी सुरू केलेली Eagle Eye ही प्रणाली व परिक्षेत्रातील गैरप्रकार व अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सुरू केलेली हेल्पलाइन 'खबर' ( ९१ ५० १०० १००) या बाबी महत्त्वपूर्ण ठरल्या.

१५० दिवसांच्या सदर कार्यक्रमाची मुदत दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी पूर्ण झाल्यानंतर, परीक्षेत्रीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन प्रथमतः पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात येऊन, त्यातून (४) परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक/ उपमहानिरीक्षक कार्यालयांची निवड करण्यात आली होती. यात नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची देखील निवड करण्यात आली होती. त्यानंतर परिक्षेत्र कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांनी केले होते. परिषदेने पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने केलेल्या उपरोक्त कामकाजाची दखल घेऊन परिक्षेत्रास प्रथम क्रमांक बहाल केला होता.

यापूर्वी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात देखील नांदेड परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता.

परिक्षेत्र कार्यालयातील पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांचेसोबतच Rythmbytes कंपनीचे सॉफ्टवेअर इंजिनिअर हर्षानंद शर्मा, SETTribe कंपनीचे संचालक सारंग वाकोडीकर व सॉफ्टवेअर इंजिनिअर शहेबाज खान, पोलीस अंमलदार दीपक पवार यांनी अहोरात्र घेतलेल्या परिश्रमामुळेच हे यश शक्य झाले असून, या यशामध्ये नांदेड परिक्षेत्रातील प्रत्येक अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा वाटा आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

---

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे...**

प्रयाण. सायं. ५.३० वा. शिवनेरी शिवसेना पक्ष कार्यालयाचे उद्घाटन. स्थळ– हिंगोली गेट नांदेड. सायं. ६ वा. मोटारीने बैल बाजार मैदान लोहा जि. नांदेडकडे प्रयाण. सायं. ६.३० वा. राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व पक्ष प्रवेश सोहळा स्थळ– बैल बाजार मैदान लोहा, जि. नांदेड. सायं. ७.३० वा. मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. रात्री ८ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व विमानाने मुंबई विमानतळाकडे प्रयाण करतील.

---

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते...**

खुले असणार आहे. त्यामुळे जनकल्याणासाठी शिवनेरी जनसंपर्क कार्यालय आजपासून लोकार्पण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. शिवनेरी जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यास नांदेड जिल्ह्यातील शिवसेनेच्या सर्व आजी– माजी लोकप्रतिनिधींनी, आजी–माजी पदाधिकाऱ्यांनी आणि शिवसैनिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

CMYK

# चंदेरी

# अपयशानंतर पाठिशी जेवढे लोक असतात, तेच तुमचे खरे यश!

## अभिनेत्री श्रिया सरनची विशेष मुलाखत



**दक्षिणेतील 'शिवाजी द बॉस', 'छत्रपती' आणि 'पोक्किरी राजा' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांपासून ते हिंदीतील हिट 'दृश्यम' फ्रँचायझीपर्यंत अभिनेत्री श्रिया सरन गेल्या अडीच दशकांपासून प्रेक्षकांच्या हृदयावर राज्य करत आहे. सध्या ती तिच्या 'स्पेस जेन : चांद्रयान' या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. आम्ही तिच्याशी खास संवाद साधला...**

» **प्रश्न : तुम्ही २५ वर्षांपासून अभिनय क्षेत्रात आहात. मागे वळून पाहताना तुम्हाला कसं वाटतं?**

**श्रिया** : हे सगळं एका स्वप्नासारखं आहे. जेव्हा मी इंडस्ट्रीत आले, तेव्हा मला वाटलं होतं की एक चित्रपट करून मी पुन्हा कॉलेजला जाईन, पण एकामागोमाग एक चित्रपट मिळत गेले. मला ही संधी मिळाली यासाठी मी स्वतःला खूप भाग्यवान समजते. कारण जेव्हा मी काम करायला सुरुवात केली, तेव्हा इंटरनेट नव्हतं. त्यामुळे लोकांच्या नजरेत येणं आणि काम मिळवणं सोपं नव्हतं. त्यात भर म्हणजे, जेव्हा मी काम करायला सुरुवात केली, तेव्हा मला अभिनयाबद्दल काहीच माहीत नव्हतं. मी कुठेही अभिनयाचं शिक्षण घेतलं नव्हतं, तरीही अनेक दिग्दर्शकांनी माझ्यावर विश्वास ठेवला.

> माझं सिनेमावर प्रेम जडलं आणि एकदा का प्रेम जडलं की तुम्ही ते सोडू शकत नाही. मी मोठे हिट चित्रपट पाहिले आहेत, मोठे फ्लॉप चित्रपट पाहिले आहेत आणि लोक सोडूनही गेले आहेत. मी काम नसण्याचे दिवसही अनुभवले आहेत. मी तो काळही पाहिला आहे जेव्हा मला दोन शिफ्टमध्ये काम करावं लागलं, त्यामुळे माझ्यासाठी हा कृष्णाचा आशीर्वाद आहे. इतके चित्रपट करण्याची आणि अनेक लोकांच्या आयुष्याचा भाग बनण्याची संधी मिळणे, हा एक मोठा सन्मान आहे.
> **-श्रिया सरन,** अभिनेत्री

» **प्रश्न : तुझ्या सिरिजमध्ये चांद्रयान २ अयशस्वी होते तेव्हा शास्त्रज्ञ स्वतःच्याच प्रतिभेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. तुझ्या कारकिर्दीत तू कधी स्वतःवर शंका घेण्याच्या टप्प्यातून गेली आहेस का?**

**श्रिया :** अनेक वेळा. असे अनेक प्रसंग आले आहेत, जेव्हा मीच माझ्या निवडींवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे, असा विचार करून की, मी चूक केली, मी हा चित्रपट करायला नको होता. असे अनेक वेळा घडले आहे. जेव्हा मी एखाद्या चित्रपटासाठी खूप मेहनत घेतलेली असते आणि तो यशस्वी होत नाही, तेव्हा मला माझ्याच निवडींवर शंका येते. तुम्ही कारणे शोधता, पण एवढी मेहनत करूनही तो का यशस्वी झाला नाही, हे तुम्हाला समजत नाही. तुम्ही त्या भूमिकेच्या इतके प्रेमात पडलेले असता की तुम्हाला वाटते की काहीतरी चुकले आहे. पण तुम्हाला मिळणाऱ्या संधींचा तुम्ही फायदा घेतला पाहिजे आणि पुढे गेले पाहिजे.

> **तुम्ही अपयशी व्हाल तेव्हा किती लोक तुमच्या पाठीशी उभे राहिले होते हे लक्षात ठेवा. तेच तुमचे खरे यश असेल.**
> **-श्रिया सरन, अभिनेत्री**



» **प्रश्न : प्रदीर्घ कारकिर्दीत तू रजनीकांत, नागार्जुन आणि अजय देवगण यांसारख्या दिग्गजांसोबत काम केले आहे. त्यांच्याकडून मिळालेला असा कोणता सल्ला आहे जो तुझ्या मनाला भिडला?**

**श्रिया :** जेव्हा मी रजनीकांत सरांसोबत शिवाजी द बॉस करत होते तेव्हा ती माझ्यासाठी एक खूप मोठी संधी होती. शंकर (दिग्दर्शक) सर, रजनीकांत सर आणि ए. आर. रहमान सर यांच्यासोबत काम करणे हा एक मोठा सन्मान होता. आम्ही एका गाण्याचे चित्रीकरण करत होतो आणि मला स्टेप्स बरोबर जमल्या होत्या, तेव्हा राजू सुंदरम एक अप्रतिम गोष्ट म्हणालेः तू हा चित्रपट करत आहेस, तो खूप मोठा हिट होणार आहे.

» **प्रश्न : अभिनयाचा आव्हानात्मक व्यवसाय आणि तुझी ५ वर्षांची मुलगी राधा हिची आई म्हणून तुम्ही या दोन्ही जबाबदाऱ्या कशा सांभाळता?**

**श्रिया :** आमच्या व्यस्त वेळापत्रकातही आम्ही आया आमच्या मुलांसाठी नेहमीच वेळ काढतो. जेव्हा कधी मला शूटिंगमधून दोन तासांचा ब्रेक मिळायचा, तेव्हा मी राधाला भेटायला वेळ काढायची. मी अधूनमधून तिच्याशी फेसटाइम करायची. ही एक सामाजिक मानसिकता आहे की हे प्रश्न फक्त महिलांनाच विचारले जातात. नोकरी करणाऱ्या आयांना नेहमी विचारले जाते, तुम्ही कामावर असताना मुलाची काळजी कोण घेतं? तुम्ही कामावर कशा पोहोचता? घरी कोण असतं? आपण हे सहजपणे घ्यायला हवं आणि आई असण्याचा आनंद घ्यायला हवा. आई असण्याची भावना अनमोल आहे. नोकरी करणारी आई असण्याचा आनंदही घ्यायला हवा.

# पैसे नव्हे मला लोकांच्या डोळ्यांतील आनंदाश्रू उत्साहित करतात...

**अभिनेता आमिर खानची विशेष मुलाखत**

**अभिनेता आमिर खानने केवळ चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाची ताकदच सिद्ध केली नाही, तर त्याने उत्कृष्ट चित्रपटही बनवले. आमिर प्रत्येक गोष्ट खूप काळजीपूर्वक करतो. यामुळे त्याला 'मिस्टर परफेक्शनिस्ट' हा टॅगही मिळाला. पण आमिर म्हणतो की, त्याच्यासाठी यशाचे मोजमाप चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर किती कोटी कमावले यावर ठरत नाही. दिल्ली आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (IFFD) सहभागी झालेल्या आमिर खानने सांगितले, की पैसा माझ्यासाठी तितकाच महत्त्वाचा आहे, जितका मी त्याचा वापर करू शकेन. काही लोकांसाठी पैसा अधिक महत्त्वाचा असतो, अर्थात ही काही वाईट गोष्ट नाही; प्रत्येकाच्या स्वतःच्या गरजा असतात. सुरुवातीपासूनच माझी भूमिका अशी आहे की मला पैशात कधीच रस नव्हता...**



## कथा आणि लोकांच्या भावना मला उत्साहित करतात...

आमिर खान म्हणतो, की माझे वडील चित्रपट निर्माते होते, त्यामुळे लोकांना अनेकदा असे वाटते की चित्रपट निर्मात्याचा मुलगा असण्याचा अर्थ तो श्रीमंत कुटुंबातून आलेला आहे. पण तो काळ आमच्यासाठी आर्थिकदृष्ट्या खूप कठीण होता. माझे वडील एक खूप चांगले चित्रपट निर्माते होते, पण ते एक चांगले व्यावसायिक नव्हते. कथा मला उत्साहित करतात. लोकांना हसवण्यात, माझ्या कामातून त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू पाहण्यात आणि त्यांच्या हृदयाला स्पर्श करण्यात मला उत्साह वाटतो.

## बालपण वेळापत्रक बनवून जगलो नाही...

आजकालची मुलं आपला संपूर्ण दिवस अभ्यास, शिकवणी, टेनिस क्लास आणि संगीत क्लास सांभाळण्यात घालवतात. त्यांचं वेळापत्रक आधीच गजबजलेलं असतं. आमिर म्हणतो, की माझं क्रिकेट किंवा फुटबॉलसाठी कोणतंही वेळापत्रक नव्हतं. मी क्रिकेट खेळायचो, मी फुटबॉल खेळायचो. माझ्या आईने माझ्यासाठी ते करण्याचं कधीच वेळापत्रक बनवलं नाही. पण आता ते माझ्या वेळापत्रकाचा एक भाग बनलं आहे. आम्ही शाळेतून एक वाजता घरी यायचो. बिल्डिंग खाली जाऊन स्वीटी, केवल, विकी अशी हाक मारायचो. आम्ही एकत्र जमायचो आणि खेळायला सुरुवात करायचो...

## दिवास्वप्न पाहणे खूप महत्त्वाचे...

आमिर म्हणतो, की आजच्या काळात दिवास्वप्न पाहणे आवश्यक आहे. आजकाल प्रत्येकजण आपला बहुतेक वेळ फोनवर घालवतो. आपण दिवास्वप्न पाहण्याची कला गमावत आहोत. जेव्हा कधी आपल्याला वेळ मिळतो, तेव्हा आपण फोन हातात घेतो आणि विविध ॲप्सवर छोटे व्हिडिओ पाहू लागतो. ते मनोरंजक असतात, पण ते आपल्या मनाचे आणि वेळेचे लक्ष विचलित करणारेही ठरतात. एक काळ होता जेव्हा फोन नव्हते, तेव्हा आपण गाडीत बसून फक्त विचार करायचो, आयुष्य पुढे सरकताना पाहायचो. ते दिवास्वप्न होते. मला वाटते की दिवास्वप्न पाहणे खूप महत्त्वाचे आहे. ते तुमच्या मनाला अनेक गोष्टींचा सखोल शोध घेण्याची आणि त्या समजून घेण्याची संधी देते. आज आपल्याकडे स्वतःबद्दल किंवा इतर कशाबद्दलही विचार करायला वेळ नाही. आपल्या सभोवताली फक्त माहितीचाच गोंधळ आहे.

## ज्ञान ऑनलाइन उपलब्ध असेल, तर ते वर्गात का शिकवायचे?

आमिरचा विश्वास आहे की आजच्या शिक्षण व्यवस्थेत बदल होणे आवश्यक आहे. ते म्हणतात, की माझा खरोखर विश्वास आहे की शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदलाची गरज आहे. जगात किती ग्रह आहेत, आपली सूर्यमाला कशी दिसते, एखाद्या राजाच्या काळात काय घडले आणि त्यावेळचे नेते कसे होते या सर्व गोष्टी शाळेत शिकवल्या जातात. आजच्या जगात हे किती समर्पक आहे, हे मला माहीत नाही. आज आपल्याकडे असलेले ज्ञान माझ्या बोटांवर आहे. एखाद्या व्यक्तीचा जन्म कधी झाला हे मला जाणून घ्यायचे असेल, तर मी ते त्वरित शोधू शकतो. ज्या ज्ञानाची गरज नाही, ते मी माझ्या मनात का साठवून ठेवावे? पूर्वी, जेव्हा ज्ञानाची गरज होती, तेव्हा ते शाळेत उपलब्ध होते. आता ज्ञान विनामूल्य आहे, पण त्याचा वापर कसा करायचा याचे प्रशिक्षण आपण मुलांना देत नाही. शाळेत, आपण मुलांना गोष्टी समजून घ्यायला, लोकांची काळजी कशी घ्यावी आणि एक चांगला माणूस कसा बनावा हे शिकवत नाही. सरकार वाहतुकीचे नियम बनवते, पण जर आपण ते पाळले नाहीत, तर त्या नियमांचा काय उपयोग? म्हणून मला वाटते की आपल्याला आपल्या शिक्षण व्यवस्थेचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.

# तनुश्रीला लहानपणी व्हायचे विचित्र भास

भूत, आत्मा, अंधश्रद्धा या गोष्टी अनेकांच्या चर्चेचा विषय असतात. काही जण या बाबतीत विश्वास ठेवतात; तर काही जण ठेवत नाहीत. पण, बॉलीवूडमधील एका अभिनेत्रीनं मात्र याबद्दलचा तिचा थक्क करणारा अनुभव सांगितला आहे. तिला लहानपणी विचित्र भास व्हायचे. 'भागम भाग', '२६ चायना टाऊन' यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केलेली तनुश्री दत्ता अनेकदा तिची मते, प्रतिक्रिया ठामपणे मांडत असते.

तनुश्री दत्तानं एका मुलाखतीत तिचा लहानपणीचा थरारक अनुभव सांगितला. ती म्हणाली, की भविष्यात पुढे जेव्हा काही वाईट होणार असतं तेव्हा त्यासंबंधीची माहिती तिला आधीच मिळते. ती खूप आध्यात्मिक आहे. मूळची जमशेदपूरची असलेल्या तनुश्रीने २००४ मध्ये 'मिस युनिवर्स'चा किताब जिंकला होता. त्यानंतर ती हिंदी चित्रपटांतून झळकली. पण, ती अनेकदा वादाच्या भोवऱ्यात अकडलेली असते. तनुश्रीने लोकप्रिय अभिनेते नाना पाटेकर यांच्यावरही लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. तनुश्रीने 'आशिक बनाया आपने' आणि 'ढोल' या चित्रपटांतून नाव कमावले. पडद्यावर तिने बोल्ड भूमिका साकारत प्रेक्षकांचे लक्ष वेधून



घेतले. पण, खऱ्या आयुष्यात मात्र ती खूप आध्यात्मिक आहे. लडाखमधील मठात साधना आणि आत्मनिरीक्षण करण्याचा मार्ग निवडणाऱ्या तनुश्रीचे बालपण असाधारण होते. एवढेच काय तर तिने त्या संदर्भातील एक अनुभवसुद्धा सांगितलेला. उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार अभिनेत्रीने दावा केलेला की, तिच्या परिसरातील एका घरात काहीतरी वाईट घडणार आहे, असं तिला वारंवार जाणवायचं. ती जागा चांगली नाहीये, असं तिचं म्हणणं होतं आणि तिनं तिच्या आईला त्याबद्दल सांगितलं होतं. त्यानंतर सहा महिन्यांनी त्या घरातील स्त्रीचा मृत्यू झाला, असंही तिनं सांगितल्याचं म्हटलं जातं.

# अनुष्काचे कमबॅक?

**अनुष्का शर्मा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. पण, गेल्या काही वर्षांपासून ती अभिनय क्षेत्रापासून दूर आहे. लग्नानंतर अनुष्का चित्रपटातून झळकली, परंतु तिच्या मुलीच्या जन्मानंतर तिनं जो ब्रेक घेतला त्यानंतर अजूनही तिचं कमबॅक झालेलं नाहीये. मुलीच्या जन्माच्या काही वर्षांनंतर तिच्या मुलाचा अकायचा जन्म झाला. त्यामुळे सध्या अभिनेत्री लंडनमध्ये राहत असून मुलांचं संगोपन करत असल्याचं म्हटलं जातं.**



अनुष्का शर्मानं आतापर्यंत अनेक हिट चित्रपट देत लोकप्रिय कलाकारांसह काम केलं आहे. तिनं तिच्या अभिनयानं आणि सौंदर्यानं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत, त्यामुळे तिचे चाहतेसुद्धा तिला पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी उत्सुक आहेत. अशातच आता अनुष्का लवकरच बिग बजेट चित्रपटातून झळकणार असल्याची चर्चा सुरू आहे. अल्लू अर्जुन लवकरच AA22xA6 या आगामी बिग बजेट चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. नंतर या चित्रपटाचं नाव बदललं जाणार आहे. एटली या चित्रपटाचं दिग्दर्शन करत आहे. असं म्हटलं जातंय की या चित्रपटात मोठे कलाकार झळकणार आहेत. दीपिका पादुकोण चित्रपटात मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेतून झळकणार आहे. हा एक सायन्स फिक्शन चित्रपट असणार आहे. या चित्रपटात अनुष्का शर्माही झळकणार असल्याची चर्चा असून याबद्दल अभिनेत्रीसह चर्चा सुरू असल्याचं म्हटलं जात आहे. जर समोर आलेली ही माहिती खरी ठरली तर अनुष्का शर्माचा हा पहिला तेलुगू चित्रपट असणार आहे. अनुष्का शेवटची २०१८ मध्ये आलेल्या शाहरुख खानच्या 'झिरो' चित्रपटातून झळकली होती.

# वयाच्या 60 व्या वर्षी मिलिंद सोमण का आहे फिट?

**मिलिंद सोमण त्यांच्या अभिनयासह फिटनेसमुळेही अनेकांच्या चर्चेचा विषय असतात. वयाच्या साठीतही ते खूप फिट असून, आरोग्याची नीट काळजी घेतात, नियमित व्यायाम करतात. पण, तुम्हाला माहीत आहे का मिलिंद हे इतर सेलिब्रिटींप्रमाणे कुठलाच ठराविक डाएट फॉलो करत नाहीत, असं त्यांनी स्वतः एका मुलाखतीत म्हटलं आहे.**



मिलिंद म्हणाले, की मला गेल्या ४० वर्षांमध्ये काहीच वेगळं जाणवलेलं नाहीये. मी मला हवं असतं तेच करतो एवढंच आहे. माझा कुठलाही डेली रूटीन नसतो. माझा कोणी कोच नाहीये, ट्रेनर नाहीये किंवा इतर कोणीही नाहीये, जे मला सांगतील की काय काय केलं पाहिजे. माझा डाएट प्लॅन नाहीये, मी जीमला जात नाही. त्यामुळे असं कुठलं रूटीन नाहीये. माझ्यासाठी आयुष्य जगणं महत्त्वाचं आहे. आता उपलब्ध असलेल्या माहितीमुळे सगळ्यांना माहीत आहे की काय त्यांच्यासाठी चांगलं आहे, काय नाही. काय कधी खाल्लं पाहिजे, व्यायाम वगैरे याबद्दल सगळ्यांना माहीत असतं. त्यामुळे या गोष्टी नियमितपणे करणं महत्त्वाचं असतं, त्याचा तुमच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर चांगला परिणाम होतो. मिलिंद म्हणाले, की तुम्हाला लोक काय करत आहेत यापेक्षा स्वतःला समजून घेण्याची गरज आहे, ही गोष्ट अनुभवातूनच कळते.

# नेपाळमध्ये नव्या सरकारचा शपथविधी; दुसऱ्याच दिवशी माजी पंतप्रधान आणि माजी केंद्रीय गृहमंत्र्याला उचलत बेड्या ठोकल्या



**नेपाळ (वृत्तसंस्था)** – नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली आणि माजी गृहमंत्री रमेश लेखक यांना गेल्या वर्षीच्या 'जनरेशन-झेड' आंदोलनासंदर्भात आज (२८ मार्च) सकाळी पोलिसांनी अटक केली. नवे पंतप्रधान म्हणून ३५ वर्षीय बालेन शाह यांनी शपथ घेतल्यानंतर काही दिवसांतच, कालच ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ओली यांना शनिवारी सकाळी भक्तपूरच्या गुंडू येथील त्यांच्या निवासस्थानी अटक करण्यात आली. माजी केंद्रीय रमेश लेखक यांना पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास सूर्यविनायक येथे अटक करण्यात आली.

गृह मंत्रालयाने केलेल्या तक्रारीनंतर सुरू झालेल्या चौकशीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. एका चौकशी आयोगाने शिफारस केली आहे की, या नेत्यांवर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करावा, ज्यासाठी १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. या अहवालात अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या आंदोलनात ७७ लोकांचा मृत्यू झाला होता आणि अब्जावधी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले होते. वैद्यकीय तपासणीनंतर ओली यांची एका बटालियनमध्ये रवानगी केली जाईल. पोलीस लवकरच ओली आणि रमेश लेखक यांना महाराजगंज येथील सशस्त्र पोलीस दलाच्या बटालियन क्रमांक २ मध्ये हलवणार आहेत. अटकेनंतर दोन्ही नेत्यांना वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आले होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांची वैद्यकीय तपासणी पूर्ण झाल्यावर त्यांना बटालियनमध्ये ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. हे पाऊल सध्या सुरू असलेल्या कोठडी प्रक्रियेचा एक भाग म्हणून उचलले जात आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, महाराजगंज येथील बटालियन क्रमांक २ मध्ये दोन्ही नेत्यांना ठेवण्याची सर्व तयारी करण्यात आली आहे. त्यांच्या वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना तिथे हलवण्यात येईल.

माजी न्यायाधीश गौरी बहादूर कार्की यांच्या अध्यक्षतेखालील एका आयोगाने या प्रकरणाची चौकशी केली. आपल्या अहवालात, आयोगाने असा निष्कर्ष काढला की आंदोलनादरम्यान परिस्थिती हाताळण्यात गंभीर निष्काळजीपणा झाला होता. अहवालानुसार, गुप्तचर यंत्रणेकडून पूर्वसूचना मिळूनही अधिकाऱ्यांनी योग्य कारवाई केली नाही, ज्यामुळे परिस्थिती आणखी बिघडली आणि अनेक लोकांचा जीव गेला. अटकेपूर्वी, पंतप्रधान बालेन शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अहवालाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानंतरच पोलिसांनी हे पाऊल उचलले. अटकेवेळी काठमांडू खोऱ्यात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली होती आणि पोलिसांची अनेक पथके तैनात करण्यात आली होती.

# युद्धाचा मालवाहतूक व्यवसायाला फटका; ट्रकभाड्यात २०% वाढ




**नाशिक (प्रतिनिधी)** – इराण-इस्रायल युध्दाची झळ वाहतूक व्यवसायालाही बसली असून अस्थिर वातावरणामुळे भाडेही २० टक्क्यांनी वाढले आहे. मालवाहतुकीला परराज्यात जातांना जागोजागी डिझेल मिळाले किंवा हॉटेल्स खुले राहतील की नाही याची शाश्वती नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे.

शहरांतर्गत मालवाहतुकीवर अद्याप परिणाम दिसत नसला तरी शहरातून जाणारा कृषी माल, उद्योगांची उत्पादने, शहरात येणारे धान्य, किराणा यांवर याचा परीणाम झाला आहे. नाशिकमध्येच दररोज किमान ११५० ट्रक, ट्रेलर माल घेऊन येतात आणि तितकेच बाहेरच्या राज्यात माल पोहोचवतात, त्यापैकी ३० टक्के वाहनांना ब्रेक लागला आहे.

मालवाहतूक व्यवसायाला देशाच्या धमण्या मानल्या जातात. मात्र गेल्या पाच दिवसांपासून देशभरात इंधनासाठी लागलेल्या रांगांमूळे रस्त्यात डिझेल मिळेलच याची शाश्वती राहिलेली नाही. दुसरी बाब म्हणजे, व्यवसायिक सिलिंडरअभावी अनेक हॉटेल्स बंद पडले आहेत, त्यामुळे जेवण मिळेलच याचीही शाश्वती वाहनचालकांना राहिलेली नाही. अनेक वाहनचालक वाहन रस्त्याच्या कडेला लावून आपला स्वयंपाक बनवतात, त्याकरीता प्रवासात कुठेही घेवून जाता येणारे तीन लिटरचे सिलिंडर वापरले जाते. ते यापूर्वी कुठेही भरून मिळत होते किंवा बदलून मिळत होते. आता तेही मिळणे बंद झाले आहे. या सर्व अनिश्चिततेमुळे वाहनचालक एकतर मालवाहतुकीला जाण्यास तयार नाहीत किंवा जास्तीचे पैसे मागतात. यामुळे मालवाहतुकीचे भाडेही २० टक्क्यांनी महागले असून किमान ३० टक्के वाहनांना ब्रेक लागला आहे.

# 'पीएनजी' गॅसच्या जोडण्यावर भर देणार

## ३ महिन्यांनी 'एलपीजी' बंद होईल -भुजबळ



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – राज्यातील विविध शहरांत स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला असताना राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी कदाचित ३ महिन्यांत एलपीजी गॅस बंद होईल असे पोटात गोळा उठवणारे विधान केले आहे. सध्या पीएनजी गॅस स्वस्त पडत आहे. त्यामुळे त्याचा अधिकाधिक वापर झाला पाहिजे. केंद्राच्या एका पत्रकात ३ महिन्यांनी कदाचित एलपीजी बंद होईल असा उल्लेख आहे. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या घेतल्या पाहिजेत, असे ते म्हणालेत.

नवी दिल्लीत आज केंद्रीय शहरी विकास मंत्री मनोहरलाल खट्टर व केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या नेतृत्वात एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी व पीएनजी गॅसचा अधिक चांगला व सुलभ पुरवठा उपलब्ध करून देणे, तसेच एका निश्चित कालावधीत पीएनजी सेवांचा विस्तार करण्याच्या मुद्यावर चर्चा झाली. त्यानंतर महाराष्ट्र सदनात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री मंत्री छगन भुजबळ यांनी वरील विधान केले. भुजबळ म्हणाले, देशातील निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी गॅसचा पुरवठा सुलभपणे कसा करता येईल? त्यात कोणत्या अडचणी आहेत याचा आढावा घेण्यासाठी आज दिल्लीत सर्व राज्यांच्या सचिवांना आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना बोलावण्यात आले होते. या बैठकीला केंद्रीय मंत्री हरदीप पुरी, प्रल्हाद जोशी व मनोहरलाल खट्टर उपस्थित होते. त्यांनी सर्वच राज्याचे मंत्री व सचिवांना काही सूचना केल्या. त्यानुसार, पीएजी गॅस सध्या स्वस्त पडत आहे. त्याचा जास्तीत जास्त वापर झाला पाहिजे. त्याचा जास्त प्रसार झाला पाहिजे.

केंद्र सरकारच्या एका पत्रकात कदाचित ३ महिन्यांनी एलपीजी बंद होईल असा उल्लेख होता. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या करून घेतल्या पाहिजेत. ज्या ठिकाणी यासंदर्भात काम करणे शक्य आहे, तिथे ते सुरू केले पाहिजे. सगळ्या नगरपालिकांनी पीएनजीच्या जोडण्या वाढवल्या पाहिजे. पाण्याचे व वीजेचे कनेक्शन असल्यावरच इमारतींना ओसी दिली जाते. त्याप्रमाणेच आता पीएनजी कनेक्शनच्या सक्तीची अट टाकली पाहिजे. आपल्याला पीएनजी जोडण्या लवकरात लवकर करायच्या आहेत. पाईपलाईन टाकण्यासाठी विविध विभागांना परवानग्या मागितल्या जातात. पीएनजी मिळाली असे समजावे. या परवानग्या २४ तासांत दिल्या जातील. पीएनजी काम करणाऱ्यांना २४ तास परवानगी राहील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाची दमदार कामगिरी; राज्यात द्वितीय क्रमांक

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांना प्रशस्तीपत्र प्रदान

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र शासनाच्या '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम' अंतर्गत झालेल्या राज्यस्तरीय मूल्यमापनात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. डिजिटल रूपांतरणाच्या दिशेने ठोस पावले उचलत विभागाने राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आज मुंबई येथील सह्याद्री सभागृहात पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांना प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावरील शासकीय कार्यालयांच्या कामकाजाचे सात महत्त्वपूर्ण निकषांवर सखोल परीक्षण करण्यात आले. संकेतस्थळ व्यवस्थापन, 'आपले सरकार' सेवा, ई-ऑफिस प्रणाली, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तंत्रज्ञान तसेच भौगोलिक माहिती प्रणालीयांसारख्या आधुनिक साधनांचा प्रभावी वापर करून छत्रपती संभाजीनगर विभागाने प्रशासन अधिक स्मार्ट, पारदर्शक आणि गतिमान बनवले आहे.

ही मूल्यांकन प्रक्रिया दोन टप्प्यांत पार पडली असून अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. या स्पर्धात्मक



प्रक्रियेत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांमधून द्वितीय क्रमांक मिळवणे ही मोठी आणि अभिमानास्पद कामगिरी मानली जात आहे.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांचे समन्वित प्रयत्न निर्णायक ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ई-गव्हर्नन्स उपक्रमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली. विभागनिहाय सातत्यपूर्ण आढावा, ई-ऑफिसचा प्रभावी वापर आणि नागरिक-केंद्रित निर्णय प्रक्रियेवर भर दिल्याने प्रशासन अधिक सक्षम आणि परिणामकारक झाले आहे. ई-गव्हर्नन्सच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शासकीय सेवा वितरणात पारदर्शकता, वेग आणि सुलभता वाढली आहे.

# सोने या आठवड्यात रू. ४,२७६ ने तर चांदी रू.१०,७१७ ने स्वस्त

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – या आठवड्यात सोने-चांदीच्या दरात घसरण झाली. सोने आठवडाभरात ४,२७६ रुपयांनी घसरून १.४३ लाख रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचले. यापूर्वी ते गेल्या आठवड्यात म्हणजेच २० मार्च रोजी १.४७ लाख रुपयांवर होते.

तर, चांदी २.३२ लाख रुपये प्रति किलोवरून घसरून २.२१ लाख रुपयांवर पोहोचली आहे. म्हणजेच, त्याची किंमत १०,७१७ रुपयांनी कमी झाली. अमेरिका-इस्रायलच्या इराणसोबत सुरू असलेल्या युद्धामुळे, बाजारातील अस्थिरतेचा सामना करण्यासाठी गुंतवणूकदार त्यांच्या 'गोल्ड होल्डिंग्स' विकून रोख रक्कम (डॉलर) जमा करत आहेत. यामुळे डॉलरची मागणी वाढत आहे आणि सोने-चांदीचे दर घसरत आहेत.

# भारतीय सैनिकांना मिळाल्या प्रहार लाईट मशिन गन

**ग्वाल्हेर (प्रतिनिधी)** – भारतीय लष्कराचे सामर्थ्य आता आणखी वाढणार आहे. मेक इन इंडिया अंतर्गत तयार झालेल्या तब्बल दोन हजार प्रहार लाईट मशिन गन जवानांना मिळाल्या आहेत. अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनीने या शस्त्राची निर्मिती केली आहे. लवकरच आणखी प्रहार लाईट मशिन गन भारताच्या जवानांना मिळणार आहेत.

अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनीने एका विशेष सोहळ्यात प्रहार लाईट मशिन गनची पहिली बॅच भारतीय लष्कराला सुपूर्द केली. याप्रसंगी संरक्षण मंत्रालयाचे खरेदी विभागाचे महासंचालक ए. अंबरासू, अदानी डिफेन्स अँड एरोस्पेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष राजवंशी तसेच अदानी डिफेन्सचे इतर अधिकारी उपस्थित होते. अंबरासू यांनी लष्करासाठीच्या एलएमजी अर्थात प्रहार लाईट मशिन गनने भरलेल्या ट्रकला हिरवा झेंडा दाखवला. यानंतर ट्रक लष्कराच्या छावणीच्या दिशेने रवाना झाला.

अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनीने विहित कालावधीच्या ११ महिने आधीच तब्बल दोन हजार प्रहार लाईट मशिन गन पुरवठा केला आहे. प्रयोग करून अंतिम निर्मित करण्यासाठी सात वर्षांचा कालावधी देण्यात आला होता. पण कंपनीने सहा वर्ष आणि एक महिना या कालावधीत गनचा पुरवठा केला. नियोजनानुसार पुढील तीन वर्षांत लष्कराच्या मागणीनुसार पूर्ण पुरवठा केला जाणार असल्याची ग्वाही अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनीने दिला आहे.

# समृद्धी महामार्गावर अपघात; ट्रकचालक ठार

**मंगरुळपीर (प्रतिनिधी)** – वाशिम जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर कारंजा ते वनोजा टोल प्लाझा दरम्यान चॅनल क्रमांक १९७ जवळ पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. या अपघातात एका ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला असून, या घटनेमुळे महामार्गावरील सुरक्षा आणि आपत्कालीन मदत यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागपूरहून मुंबईकडे मालवाहतूक करणारा एक ट्रक प्रवास करत असताना अचानक त्याचा डिझेल पाईप तुटला. त्यामुळे संबंधित ट्रक महामार्गाच्या मधोमधच नादुरुस्त अवस्थेत उभा राहिला. या परिस्थितीत ट्रक चालकाने तत्काळ समृद्धी महामार्गावरील मदत यंत्रणा तसेच वाहतूक पोलिसांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, वारंवार फोन करूनही कोणतीही मदत वेळेत उपलब्ध झाली नाही, अशी माहिती समोर येत आहे.

# अजित पवारांच्या आठवणीत सुनेत्रा पवार भावुक

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याते माजी उपमुख्यमंत्री तथा दिवंगत नेते अजित पवार (क्षळीं झुरी) यांच्या विमान अपघाताच्या दुर्घटनेला आज दोन महिने पूर्ण झाले. २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास अजित पवारांचे विमान दुर्घटनेत निधन झाले. या घटनेला आज २ महिन्यांचा कालावधी उलटला असून आजही राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्यांना, नेत्यांना दादांची उणीव प्रकर्षणाने जाणवते. महाराष्ट्रातील जनतेच्या मनातही या अपघाती निधनाने अतिव वेदना आहेत. दुसरीकडे या अपघाताच्या तपासासाठी आमदार रोहित पवार सातत्याने पाठपुरावा करत आहेत. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विधानसभेतून हा अपघात जर घातपात असेल तर कोणालीही सोडणार नाही, असा इशाराच दिलाय. दरम्यान, आज अजित पवारांच्या निधनाला दोन महिने झाल्यांतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार (डींपर्शीर झुरी) यांनी भावुक होत आठवणी जागवल्या आहेत.

अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. आज अजित पवारांच्या जागी कार्यरत असताना तुमची उणीव प्रकर्षणाने जाणवते, असे सुनेत्रा पवार यांनी म्हटलंय. ''दादा, आज तुम्हाला जाऊन दोन महिने पूर्ण झाले. काळ पुढे सरकतोय, पण मन अजूनही तुमच्याच आठवणींमध्ये गुंतून राहिले आहे. प्रत्येक क्षणी तुमची उणीव प्रकर्षाने जाणवते आणि त्याचवेळी दैनंदिन राजकीय व सामाजिक कामकाजात तुमचे अस्तित्वही जाणवत राहते. तुमच्यातील लोकाभिमुख - विकासाभिमुख व्यक्तिमत्व, सर्वसामान्यांशी असलेली जिव्हाळ्याची नाळ, कामासाठीची झपाटलेली वृत्ती आणि प्रत्येक निर्णयामागची दूरदृष्टी हे सगळेच मला कायम मार्गदर्शन करण्याचे काम करतील. तुम्ही केवळ एक नेते नव्हता, तर असंख्य लोकांच्या आयुष्यात विश्वास, बळ आणि आशा निर्माण करणारे आधारस्तंभ होता. तुमच्यामुळे अनेकांना दिशा मिळाली, संधी मिळाली आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद मिळाली.'', अशा शब्दात सुनेत्रा पवार यांनी भावना व्यक्त केल्या.


## टी.सी. हरवली

माझी सलील बाशुमियाँ शेख या नावाची आठवी पासची टी.सी. हिमायतनगर ते नांदेड रेल्वे प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क**
**मो. ९४२०८४८५१८**


# पेट्रोलवरील रेशनिंगचा निर्णय सरकारकडून रद्द

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – राज्यातील १० जिल्हाधिकाऱ्यांनी इंधनाचे रेशनिंग करण्याचा चुकीचा निर्णय घेतला. त्यामुळे पेट्रोल पंपांवर गुरुवारी प्रचंड रांगा लागल्या. राज्यातील ७ हजारांपैकी १६०० पंप ड्राय आऊट होऊन भितीचे वातावरण पसरू लागले. ही बाब लक्षात येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप केला. १० जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली चूक दुरुस्त करण्यात आली. इंधनाच्या रेशनिंगचा आदेश मागे घेण्यात आला. हवे तेवढे इंधन मिळू लागल्याने वाहनाच्या रांगा काही प्रमाणात घटल्या.

लॉकडाऊनच्या अफवेमुळे लोकांनी इंधनाचा साठा करणे सुरू केले. त्यांना रोखण्यासाठी राज्यातील १० जिल्हाधिकाऱ्यांनी दुचाकीला २०० आणि चारचाकीला २ हजार रुपयांचेच पेट्रोल-डिझेल द्या, असे आदेश पंपचालकांना दिले होते. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरात २३ गॅस एजन्सीवर टंचाई, अफवेने निर्माण 'पॅनिक' स्थिती रोखण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी महसूलचा एक लिपिक तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. हा कर्मचारी लोकांच्या समस्या काय आहे. मोबाईलवर ओटीपी येतो का. नियमानुसार सिलिंडर वितरण होते का? याची पाहणी करेल. जिल्ह्यात ११.७७ लाख गॅसधारक असून पुरवठ्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी हा 'सरकारी वॉच' महत्त्वाचा ठरेल. सूत्रांनी सांगितले की, पंपचालकांनी डेपोंना आगाऊ रक्कम देण्यास नकार दिल्यानेही नियोजन कोलमडले. त्यातच रेशनिंग निर्णयाची भर पडली. यामुळे रांगा वाढल्या. मात्र मुख्यमंत्री फडणवीसांकडे काही सचिवांनी 'साठा मुबलक' एवढाच धोशा लावला होता. दरम्यान, भाजपच्या काही मंत्र्यांनी रात्री उशिरा फडणवीसांना वस्तुस्थिती सांगितली. त्यामुळे त्यांनी शुक्रवारी सकाळीच रेशनिंग रद्दचे आदेश दिले.

# येत्या आठवड्यात शेअर बाजारचे कामकाज फक्त तीन दिवस

**मुंबई (प्रतिनिधी)** – नॅशनल स्टॉक एक्सचेंज आणि बॉम्बे स्टॉक एक्सचेंज या दोन्ही ठिकाणी पुढल्या आठवड्यात फक्त तीन दिवस कामकाज चालणार आहे. यामुळे शेअर बाजार फक्त तीन दिवस सुरू असेल. उर्वरित चर दिवस सुटी असेल. यापैकी शनिवार आणि रविवारी शेअर बाजाराला सुटी असते. या आठवड्यात महावीर जयंतीनिमित्त मंगळवार ३१ मार्च आणि शुक्रवार ३ एप्रिल रोजी रामनवमीनिमित्त शेअर बाजाराला सुटी असेल.

मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया, देशातील सर्वात मोठे कमोडिटी एक्सचेंज, महावीर जयंतीला पूर्णपणे बंद राहणार नाही.


## Change In Name

My Old Name is **SHAIKH NEHA NAUSHEEN NAZIR HUSSAIN** which now I am changing as New Name **NEHA NAUSHIN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H.No. B-3/34, Police Colony, Rest House, Shivajinagar, Nanded 431602
Mo.No. 8805778609



## GYAN MATA VIDYA VIHAR

Near Airport, Kamtha Road, Nanded (MS)-431605
(CBSE Affiliation No. 1130194)
Email: gyanmata1988@gmail.com, Ph: 8275052380

**Teachers / Staff Required**

Gyan Mata Vidya Vihar School (CBSE), Near Airport, Nanded, requires qualified & trained Sanskrit, Hindi, Marathi teachers for classes 6 to 10, Interested candidates can mail the CV along with application to gyanmata1988@gmail.com by 6th April 2026. Salary will be negotiable. (Contact No. 8275052380)


Principal



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८





## तहसिल कार्यालय देगलूर

वेबसाईट www.nanded.gov.in | ई-मेल tahdegloor@gmail.com
शाखा- महसूल-2 | दुरध्वनी क्र.02463 255033
जा.क्र.2025/जमा-2/है.इ.नि./देगलूर/कावी- | दि. ०५/02/2026

### जाहीर प्रगटन

विषयः- जिल्हयातील सर्व हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा 1954 चे कलम 6(3) नुसार झालेल्या जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग 2 चे भोगवटदार वर्ग-1 मध्ये रुपांतर करणेबाबतच्या प्रकरणातील माहिती सादर करणेबाबत
संदर्भः- मा.अप्पर जिल्हाधिकारी नांदेड यांचे अ.शा.पत्र क्र.2025/साशा/1/भुसूधार/कावी- दि.11/12/2025

**देगलूर तालुक्यातील** सर्व जनतेस कळविण्यात येते कि,हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा 1954चे कलम 6(3)नुसार झालेल्या जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग 2 चे भोगवटदार वर्ग-1 मध्ये रुपांतर करणेबाबतच्या प्रकरणात **मौ.देगलूर येथील सर्वे नं.72 गट क्र.264 मधील क्षे.0.66 आर.** या जमिनीचे **अर्जदार श्री.बालाजी रामलू पांचाळ रा.भोकसखेडा ता.देगलूर** यांनी मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे कार्यालयास अर्ज देऊन विनंती केली आहे.

उक्त प्रकरणात सदर जमिनीबाबत खालील मुद्याप्रमाणे कोणाचे आक्षेप आहेत काय?
1. खरेदीखत अधिकार अभिलेखाबाबत न्यायालयीन वाद किंवा न्यायालयात प्रकरणे चालू आहे किंवा कसे?
2. जमीन वक्फ मालमत्ता आहे किंवा कसे?
3. सदर जमीन संपादन झाली आहे किंवा कसे ?
4. सदर जमिन खिदमतमाश आहे काय? (होय/नाही)

तसेच सदरील जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग 2 चे भोगवटदार वर्ग-1 मध्ये रुपांतर करणेबाबत कोणाचा आक्षेप असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्दी पासून 7 (सात) दिवसाचे आत तहसिल कार्यालय देगलूर येथे हजर राहून आपला आक्षेप नोंदविण्यात यावा.

उक्त कालावधीनंतरचे आक्षेप ग्राहय धरले जाणर नाहीत व सदरील **मौ.देगलूर येथील सर्वे नं.72 गट क्र.264 मधील क्षे.0.66 आर.** या जमिनीचे हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा 1954 चे कलम 6(3) नुसार झालेल्या जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग 2 चे भोगवटदार वर्ग-1 मध्ये रुपांतर करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तहसिलदार देगलूर



## जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र ८२/ २०२६ — पुढील तारीख – २३.०४.२०२६

अर्जदार :
०१. गंगाबाई भ्र. दत्ता कोळनुरे ,वय-७० वर्षे, व्यवसाय -घरकाम ,
०२. मनोहर पि. दत्ता कोळनुरे , वय -४६ वर्षे, व्यवसाय – शेती,
०३. दिनकर पि. दत्तात्रय कोळनुरे, वय -४४ वर्षे, व्यवसाय – शेती,
तिघे रा. आदमपुर ता. बिलोली जि. नांदेड.
०४. भारतबाई भ्र. मुरारी कंधारे, वय – ५० वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. कौठा ता. कंधार जि. नांदेड.

विरुध्द.

गैरअर्जदारः निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत दत्ता उर्फ दत्तात्रय कोळनुरे** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक ०१ हि **मयत दत्ता उर्फ दत्तात्रय कोळनुरे** यांची पत्नी आहे व अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे **मयत दत्ता उर्फ दत्तात्रय कोळनुरे** यांचे मुले आहेत व अर्जदार क्रमांक ०४ हि विवाहीत मुलगी आहे. **मयत दत्ता उर्फ दत्तात्रय कोळनुरे** यांचा मृत्यु दिनांक २३/०१/२०२६ रोजी झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ यांना **मयत दत्ता उर्फ दत्तात्रय कोळनुरे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपीक — दिवाणी न्यायालय व. स्तर.,बिलोली.
आदेशावरून, सहा. अधिक्षक — दिवाणी न्यायालय व. स्तर.,बिलोली.

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# नांदेडमधील कामठा जुगार अड्ड्यावर आयजी शहाजी उमाप यांच्या पथकाची कारवाई

## ४१ आरोपींविरुद्ध गुन्हा, ११ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराला लागून असलेल्या गाडेगाव रोडवरील कामठा गाव परिसरात जुगार अड्डा सुरू असल्याची माहिती पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना 'खबर हेल्पलाइनवरून प्राप्त झाली. या माहितीवरून त्यांनी पोलीस अधिकारी पंकज इंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांना विमानतळ हद्दीत रवाना केले. या कारवाईत ४१ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, ११ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उमाप यांच्या आदेशावरून दि. २७ मार्च रोजी गाडेगाव रोडवरील कामठा परिसरात जगनलाल देवीलाल यादव याच्या मालकीच्या जागेत एका टिन शेडमध्ये पपलू नावाचा जुगार खेळणाऱ्या ४१ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ लाख ५० हजार ९५० रुपयांची रोकड, ३७ मोबाईल व १२ दुचाकी असा एकूण ११ लाख ४७ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सर्व जुगाऱ्यांविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्या फिर्यादीवरून कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास विमानतळ पोलीस ठाण्यातील सपोनि संतोष जोंधळे करीत आहेत.

जुगाऱ्यांना प्रशिक्षण देणारे केंद्र उपलब्ध कागदपत्रांप्रमाणे कामठा येथील जुगार अड्ड्यावर जुगाऱ्यांना जुगार खेळण्याचे प्रशिक्षण देण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्र हे 'राज कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ', चिंचवडगाव, ता. वडवणी, जिल्हा बीड यांच्या मार्फत चालविण्यात येते. मात्र प्रत्यक्षात विशेष पथकाने केलेल्या कारवाईत येथील जुगार अड्ड्यावर ४१ आरोपी, पपलू नावाचा जुगार खेळत असल्याचे आढळून आले.

चिंचवडगाव येथील क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने परिक्षेत्रात अनेक ठिकाणी अशा प्रकारची जुगार प्रशिक्षण केंद्रे सुरू केल्याची माहिती आहे. यापूर्वी परभणी जिल्ह्यातील लिमला, ताडकळस व मर्डसगाव तालुका गंगाखेड येथील प्रशिक्षण केंद्रांवर धाड टाकून, विशेष पथकाने अनेक जुगाऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह हवालदार प्रदीप खानसोळे, संजीव जिंकलवाड, अंमलदार गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांचा सहभाग होता.

**धाड प्रकरणातील हे आहेत जुगारी**

जगनलाल देवीलाल यादव गुरुखुदे, गोविंद प्रतापसिंह चौहान गाडेगाव, शुभम प्रभाकर ठाकूर गाडेगाव, गुणवंत उर्फ सानू जगन्नाथ ठाकूर गाडेगाव, आकाश राजेश पलनाडे जुना कौठा नांदेड, शेख रफीक शेख मनीर आसरानगर, नावेद अब्दुल हमीद पाथान आसरानगर, इरफान मोहम्मद नुरी प्रियदर्शिनी नगर, सुरेश नामदेव बाहारे एकलव्य ता. नांदेड, भिकारी देविदास पगारे विमानतळ नांदेड, शिवा जनार्दन ठाकूर हडको कॉलनी नांदेड, जावेद अहमद रहमतुल्ला खान फैसल पकवांजवळ, देगलूर नाका, पांडुरंग शिवनाथ बंधागर राष्ट्रीय महामार्ग, विमानतळ, अब्दुल वाहिद अब्दुल खलील पीरबुऱ्हाननगर नांदेड, राहुल जनार्दन ठाकूर गाडेगाव, रघु नारायण भारती पांडववाडी, प्रकाश बालाजीराव येणवाळ अंबाजोगाई रोड, नांदेड, दिलीप बालाजी शिंदे गोविंद चौक, समीर कोठडिया आशिफ शिवाजीनगर रोड, नांदेड, विमानतळ, शेख फैय्याज शेख नईम आसरानगर, मोहम्मद शाहरुख मोहम्मद कलीम पिपळे गंज गल्ली नं.२२ नांदेड, माधव विठ्ठल डोंगरे गोविंद चौक, राजेश विश्वास बाखळे विमानतळ, शिवराज शीतलसिंह परमार बाफना नगर कॉलनी, राजू नंदकिशोर कुडले नांदेड, राजसिंह भगवानसिंह ठाकूर गाडेगाव, मोहम्मद मोईजुद्दीन मोहम्मद वसीम, शेख अंजूम शेख हुसेन, बालाजी किशन भारती, गिरधर जम्मूसिंग ठाकूर, शेख फरीद शेख युनूस, कुणाल परसरामसिंह ठाकूर, शितलसिंह धरमसिंह ठाकूर, विशालसिंह परसरामसिंह ठाकूर, विजय करणसिंह ठाकूर, तुलजेस विठ्ठलसिंह ठाकूर, नवीनसिंह सुभाष लोधा, विक्रमसिंह तारासिंह परमार, मोहन लक्ष्मणराव मेकलवार, बलदेवसिंह कीर्तीसिंह ठाकूर, सत्यनारायण विजयसिंह बैस, अजय कल्याणराव देशमुख, देवेंद्र जगनलाल यादव गुरुखुदे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार



**मुदखेड (प्रतिनिधी)** –नांदेड शहरात खरेदी करून घराकडे परत येत असताना शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी रात्री ९:३० च्या सुमारास भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने दुचाकीस्वारास चिरडल्याची घटना मुगट पाटी जवळ घडली. यामध्ये कन्हैयासिंग विठ्ठलसिंग राठोड रा. शिवाजीनगर मुदखेड यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

या घटनेच्या ठिकाणावरून अज्ञात वाहन फरार झाले आहे. यापूर्वी हायवा दुचाकी अपघातात मुदखेड शहरातील सुवर्ण कारागीर संतोष टाक यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. यानंतर काही दिवसांपूर्वीच माळकोठा या ठिकाणी टिप्परने दुचाकी उडविल्याने यामध्येही एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. यानंतर आता आमलेट विक्रेता गावाकडे परत येत असताना अज्ञात वाहनाने चिरडल्याने कन्हैयासिंग विठ्ठलसिंह राठोड (ठाकूर) यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

वाहनाचे वेगावर नियंत्रण नसल्याने अपघाताच्या घटना सातत्याने घडत आहेत. यामुळे निष्पाप लोकांना जीव गमविण्याची वेळ आली आहे.

# नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून कौशल्य मिळवा -कुलसचिव डॉ. डी. डी. पवार



**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान व हाय मीडिया लॅब्रॉडरीज, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जैविकशास्त्र संकुलात आयोजित करण्यात आलेल्या 'अद्ययावत आण्विक जीवशास्त्र' या विषयावरील सात दिवसीय कार्यशाळेचा समारोप आज कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून त्यामध्ये प्राविण्य मिळवणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढून ते शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात सक्षमपणे टिकून राहू शकतील. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विषयाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक ज्ञान न घेता प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून विविध अत्याधुनिक तंत्रांचा अनुभव घेतला. यात डीएनए शुद्धीकरण, प्लास्मिड डीएनए वेगळा करणे, आण्विक आकार निर्धारण, निर्बंध खंड लांबी बहुरूपता, सदर्न ब्लॉटिंग, एस. डी. एस. पेज, आयन विनिमय वर्णलेखन यांसारख्या तंत्रज्ञानांची सविस्तर माहिती व प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यक्रमास संकुल संचालक डॉ. बी. एस. सुरवसे, सहसंयोजक डॉ. टी. ए. कदम, डॉ. ए. पी. पाठक, डॉ. एस. पी. चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची खरात व हरीगिरी भोंदू महाराजावर कठोर कारवाईची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)**– नाशिक येथील भोंदू अशोक खरात आणि नांदेड येथील हरीगिरी दत्तगिरी या भोंदू महाराजांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने करण्यात आली आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री फडणवीस यांना शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी निवेदन देण्यात आले आहे.

नाशिक येथील अशोक खरात या भोंदू बाबावर लैंगिक शोषण, आर्थिक शोषण, बुवाबाजी व अंधश्रद्धा विरुद्ध वेगवेगळ्या ठिकाणी पाच गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे तर नांदेड येथील हरीगिरी दत्तगिरी या भोंदू बाबांवर भाग्यनगर पोलीस स्टेशनमध्ये महिला अत्याचार विरोधी गुन्हा नोंदविला आहे.

या दोन्ही प्रकरणांमध्ये आरोपींची बुवाबाजी हे एका व्यक्तीचे कृत्य राहू शकत नाही. तर त्यामध्ये आर्थिक स्वार्थ, राजकीय तसेच प्रशासकीय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संरक्षण असू शकते. म्हणून हे प्रकरण सत्ता, संपत्ती, लैंगिक शोषण आणि बुवाबाजी या धोकादायक संगणमताचे उदाहरण आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी केवळ आरोपीपूर्ती मर्यादित न ठेवता त्यामागील संपूर्ण जाळ्याचा शोध घेणे अत्यावश्यक आहे. निष्पक्ष, राजकीय आणि प्रशासकीय दबावविरहित तपास व्हावा. जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आलीर.

# विविध कृषी पुरस्कारांसाठी ३१ मार्चपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** – कृषी उत्पादन व कृषी उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र राज्य अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. राज्य शासनातर्फे दरवर्षी कृषी क्षेत्रात संघटनात्मक कार्य करणाऱ्या व्यक्ती, गट/संस्थेला पुरस्कार देण्यात येतो. उल्लेखनीय, अतिउल्लेखनीय कार्य करणारे तसेच राज्य, जिल्ह्याला दिशादर्शक ठरणारे शेतकरी, व्यक्ती, संस्था, गटांना पुरस्कार प्रदान करण्यात येतो. राज्यात दरवर्षी शेती, फलोत्पादन व पुरकक्षेत्रात अतिउल्लेखनिय कार्य करणाऱ्या महिला शेतकरी तसेच पुरुष शेतकरी अथवा संस्थेस कृषी विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषीभुषण पुरस्कार, जिजामाता कृषीभुषण पुरस्कार, कृषीभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार व वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार इत्यादी पुरस्कार राज्यपाल महोदय महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपरिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅबमध्ये उपलब्ध आहे.

सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे.

# पोनि. चिंचोलकर यांच्या कारवाईत एक पिस्तूल, तीन जीवंत काडतूस आणि खंजर जप्त; पाच जणांना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर व जिल्ह्यातील विविध भागांत अवैध घातक शस्त्र खरेदी–विक्री करणाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेत नांदेड ग्रामीण पोलिसांनी कारवाई करत एक गावठी पिस्तूल व जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. या कारवाईत एकूण २ लाख ४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे सहकारी २८ मार्च रोजी पहाटे पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. बोंढार पाटी टी पॉईंट परिसरात सापळा रचण्यात आला. त्यानंतर संशयितांना पकडून त्यांच्या झडतीत एक सिंगल शॉट पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे, एक डेंगर आणि एक मोटारसायकल जप्त करण्यात आली.

या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २९७/२०२६ नोंद करण्यात आला असून, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत कलम ३/२५, ४/२५, ७/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई पोलीस उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, उपनिरीक्षक व्यंकट कुसमे यांच्यासह पथकाने ही कारवाई यशस्वी केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शेख रिजवान शेख निसार (वय २३), शेख शाहेद शेख चांद (वय १९), शेख सोहेल शेख इशाक (वय २५), शेख आबिद शेख युनूस (वय २४) आणि आनंद उर्फ चिंटू सखाराम यादव यांचा समावेश आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून अवैध शस्त्र विक्रीच्या साखळीचा शोध घेण्याचे काम पोलीस करत आहेत.

# पावणेदोन लाखांची सोनसाखळी लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील वजिराबाद परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एकाच्या गळ्यातील सोनसाखळी लंपास केल्याची घटना घडली आहे. ही घटना दि. २६ मार्च रोजी सायंकाळी आठच्या सुमारास डॉक्टरलेन भागात घडली.


गोविंद मुन्नालाल परीवाले (वय ५३, रा. गोकुळनगर, नांदेड) यांनी वजिराबाद पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या गळ्यातील सुमारे १ लाख ८४ हजार ४७५ रुपयांची सोन्याची चेन अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत चोरून नेली. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस अंमलदार येमेकर करत आहेत.

# पुंडलिक तरटे यांचे निधन



**शंकरनगर (प्रतिनिधी)** – बिलोली तालुक्यातील केरूर येथील पुंडलिक मरिबा तरटे यांचे वयाच्या ७० व्या वर्षी दि. २८ मार्च रोजी निधन झाले.

दिवंगत पुंडलिक तरटे यांच्या पार्थिवावर दि. २९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता केरुर येथे अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुलं, एक मुलगी, सुना, जावई, नातवंड असा परिवार आहे.



# 'कोम्बिंग ऑपरेशन' राबवून सराईत गुन्हेगारांवर कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरात २८ मार्च रोजी रात्री कोम्बिंग ऑपरेशन राबवून सराईत गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली. यात एक पिस्तूल, काडतूस, खंजिर बाळगणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करून मोक्का, हद्दपार गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली.

नांदेड शहरातील चोरी, घरफोडीसह अन्य गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत कारवाई चालू आहे. यात दि. २८ मार्च रोजी पहाटे ४ ते ८ या वेळेत शहरामध्ये सराईत गुन्हेगारांची तपासणी करून कारवाई करण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या कोम्बिंग ऑपरेशनकामी स्थानिक गुन्हे शाखा नांदेड येथील अधिकारी, अंमलदार तसेच शहरातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. कोम्बिंग ऑपरेशन राबवून त्या दरम्यान मालमत्तेविरुध्द व शरीराविरुध्द गुन्हे करणारे, अवैध शस्त्र बाळगणारे हद्दपार, तडीपार आरोपी, हिस्ट्रीशिटर सराईत गुन्हेगार यांची तपासणी करून बेलेबल व नॉनबेलेबल वॉरन्टची बजावणी करण्यात आली. तर शेख रिजवान शेख निसार, शेख शाहेद शेख चॉद, शेख सोहेल शेख इब्राहीम, शेख अदिल शेख शकील, आनंद सरदार यादव यांच्या माध्यमातून गावठी पिस्तूल, जिवंत काडतूस, खंजिर अशी शस्त्र सापडली. या सर्वांना पकडून नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिवसेना कटिबद्ध –खा. ज्योती वाघमारे

## संध्याताई फाऊंडेशनच्या वतीने पुरस्कार देऊन महिलांचा सन्मान



**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना आणली. त्यामुळे बहिणीला कायमची ओवाळणी या योजनेच्या माध्यमातून मिळाली. माझ्यासारख्या सर्वसामान्य महिलेला राज्यसभा खासदार बनविले, ही किमया शिवसेनेची आहे. आ. बालाजी कल्याणकर यांच्या सुविद्य पत्नी संध्याताई कल्याणकर यांनी एकवीस हजार महिलांना स्वावलंबी बनविले. ही बाब कौतुकास्पद असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिवसेना कटीबद्ध आहे, असे प्रतिपादन शिवसेनेच्या राज्यसभा सदस्या डॉ. ज्योती वाघमारे यांनी केले.

संध्याताई फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित जागतिक महिला दिन सप्ताहनिमित्त नांदेड येथील गोकुळ लॉन्स मालेगाव रोड येथे दि. २८ मार्च रोजी नवरत्न महिला सन्मान पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाला व्यासपीठावर प्रमुख वक्त्या म्हणून खा. डॉ. ज्योती वाघमारे, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. रूपाली सवणे परतूरकर, गोविंद गुरु महाराज, नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर, शिवालय उद्योग समुहाच्या अध्यक्षा संध्या बालाजी कल्याणकर, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम, सोलापूरचे नगरसेवक प्रियदर्शन साठे, सहसंपर्कप्रमुख दर्शनसिंघ सिद्धू, संतोष भारसावडे, शिवाजीराव कल्याणकर, महिला जिल्हाप्रमुख गीता पुरोहित, वनमाला राठोड, महिला महानगरप्रमुख श्रद्धा चव्हाण, नगरसेवक सुहास कल्याणकर, नगरसेवक योगेश मुंडे, दिपा थोरवट, तालुकाप्रमुख गणेश बोकारे, धनंजय पावडे, महिला तालुकाप्रमुख मीनाक्षी सूर्यवंशी, लता शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना खा. डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या की, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लाडके आमदार बालाजी कल्याणकर आहेत. त्यांच्या नावात कल्याणकर असल्यामुळे ते लोकांचे नेहमीच कल्याण करतात. किंबहुना अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवितात. त्यांच्यासोबत त्यांच्या सुविद्य पत्नी संध्या कल्याणकर यांचे कार्यही कौतुकास्पद आहे. २१ हजार महिलांना बचतगटाच्या माध्यमातून स्वावलंबी करणे हे फार मोठे कार्य आहे. येथे उल्लेखणीय काम करणाऱ्या महिलांचा पुरस्कार देऊन सन्मान करणे ही बाब महिलांच्या उन्नतीचे पाऊल आहे. शिवसेना नेहमीच महिलांच्या विकासासाठी कटिबद्ध राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवालय उद्योग समुहाच्या अध्यक्षा संध्याताई कल्याणकर यांनी केले. शिवालय प्रतिष्ठानच्या माध्यमातून महिलांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. महिला विविध क्षेत्रात आता काम करू लागल्या आहेत. महिलांनी आपली संस्कृती जपली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

जागतिक महिला दिनानिमित्त नवरत्न महिला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यात नवरत्न महिला सन्मान पुरस्कार के. सीताराम मोहनराव, कावेरीताई नागरगोजे, अंजली रावते, डॉ. रचिता बिडवई, डॉ. मथुताई सावंत, मनीषा मांजरमकर, पुष्पा सूर्यवंशी, भारतीताई बडुरे, अनुपमा केंद्रे, पूजा फुलारी यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश गिरे पाटील, सतीश कासेवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संध्याताई फाऊंडेशन, शिवालय उद्योग समूह, शिवालय निधी अर्बन बँकेच्या कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com